

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

गणपती बाप्पा मोरया...

वक्रतुण्ड महाकाय सूर्यकोटि समप्रभ।
निर्विघ्नं कुरु मे देव सर्वकार्येषु सर्वदा।।

www.surajyadigital.com | बुधवार, दि. ३१ ऑगस्ट २०२२ | वर्ष : २० वे | अंक : ३३२ वा किंमत : ५ रुपये | पाने ८


## आईच्या श्राध्दानंतर सख्ख्या

# भावाने केला भावाचा खून

## भांड्यांच्या भाड्यासाठी भांडण

✔ सुराज्य/सोलापूर

जन्मदात्या आईचे श्राध्द. श्राध्दाच्या सैपाकासाठी भाड्याने भांडी आणलेली. कार्यक्रम संपला; भांडी परत केली. पण त्या भांड्याच्या भाड्याचे पाचशे रुपये उधार राहिले. ते पैसे देण्यावरून दोन सख्ख्या भावात जुंपले. तू मी वरचा वाद हाणामारीपर्यंत पोहचला. त्यात एका भावाचा दुसऱ्या भावाने जीव घेतला. एक भाऊ जिवानिशी गेला तर त्याचाच दुसरा भाऊ सहकुटुंब अटकेत गेला.

### घडले काय?

दि.२८ ऑगस्ट रोजी सैफन नदाफ हे शेतात कामानिमित्त गेले होते. शेतातील मोटर चालू होत नसल्याने ते डीपीजवळ गेले. त्याठिकाणी मिरालाल आले आणि भांड्याचे भाड्यावरून वाद सुरू झाला. त्यांच्यात शिवीगाळ सुरू असतानाच मिरालाल यांची दोन्ही मुले रफिक, सलीम व पत्नी त्याठिकाणी आले. त्या सर्वांनी मिळून सैफन यास लोखंडी सळई व दगडाने जबर मारहाण केली. सैफनची पत्नी सोडविण्यासाठी गेली असता तिलाही मारहाण करण्यात आली. उपचारादरम्यान सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात मंगळवारी सकाळी सैफन यांचा मृत्यू झाला.



ही घटना आहे वळसंग पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पिंजारवाडी(ता.द.सोलापूर) या गावात घडलेली. सैफन गुडूभाई नदाफ (वय ४५) असे या भांडणात भांड्याच्या भाड्यापायी जिवास मुकलेल्या भावाचे नाव आहे. याप्रकरणी त्याचाच मारेकरी भाऊ मिरालाल गुडूभाई नदाफ, त्याची दोन मुले रफिक मिरालाल नदाफ व सलीम मिरालाल नदाफ व पत्नी झामतबी मिरालाल नदाफ यांच्या हातात पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.

### ■ भांड्याचे भाडे ठरले कारणीभूत

मृत सैफन व आरोपी मिरालाल यांची आई नाजबी गुडूभाई नदाफ यांच्या श्राध्दाचा कार्यक्रम नुकताच नदाफ कुटुंबात पार पडला. या कार्यक्रमातील सैपाकासाठी लागणारी भांडी भाड्याने आणली होती. या भांड्याचे पाचशे रुपये भाडे देण्याचे राहिले होते. राहिलेले ते भाडे हे आरोपी मिरालाल याने द्यावेत, असे मयताचे म्हणणे होते. यावरूनच त्यांच्यात पहिल्यांदा कुरबुरी झाल्या होत्या.

### ■ मिरालालचे संपूर्ण कुटुंब अटकेत

याप्रकरणी मयत सैफनची पत्नी सैनाजजी सैफन नदाफ (वय ३४) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वळसंग पोलीस ठाण्यात आरोपी मिरालाल, त्यांची दोन्ही मुले व पत्नीवर खुनाचा गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी या चौघांनाही अटक केली असूने सहायक पोलीस निरीक्षक अतुल भोसले पुढील तपास करीत आहेत.

## वेळापुरात हॉटेलचालकाच्या खुनाचा प्रयत्न

### एकाविरुद्ध गुन्हा दाखल

✔ सुराज्य/सोलापूर



हॉटेल बंद झाल्यानंतर जेवण न दिल्याच्या कारणावरून हॉटेल चालकास रॉडने मारहाण करून ड्रॉव्हरमधील रोकड आणि दागिने लोटून नेल्याची घटना वेळापूर (ता.माळशिरस) येथील हॉटेल सिद्धी गार्डन येथे शनिवारी रात्रीच्या सुमारास घडली.

यासंदर्भात जखमी मदनसिंह वसंतराव माने-देशमुख वय ५० (रा. वेळापूर) यांनी वेळापूर पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी निखिल बाळासाहेब चव्हाण (वय २५ रा. पनासेवस्ती, वेळापूर) याच्या विरुद्ध खुनाचा प्रयत्न आणि रोकड पळविल्याचा गुन्हा दाखल केला. आहे माने-देशमुख हे शनिवारी रात्री बारा वाजण्याच्या सुमारास हॉटेलमध्ये बसले होते. त्यावेळी चव्हाण याने हॉटेलात येऊन जेवणाची मागणी केली. हॉटेल बंद झाले आहे असे सांगितल्याने त्याने लोखंडी पाईपने मारहाण करून त्यांच्या अंगावरील सोन्याची चैन आणि ड्रॉव्हरमधील १३ हजार रुपये लुटून नेले, अशी नोंद पोलिसात झाली. फौजदार तनपुरे पुढील तपास करीत आहे

## सामाईक बांधाच्या वादातून पिंपळनेर येथे ३ एकर उसाला लावली आग

✔ सुराज्य/सोलापूर

सामाईक बांधाच्या वादातून वृद्ध महिलेच्या शेतातील उसाला आग लावल्याने तीन लाखाचा ऊस जळाला.ही घटना पिंपळनेर (ता.माढा) येथील पेटकर यांच्या शेतात शनिवारी दुपारच्या सुमारास घडली.

या प्रकरणात कुर्डूवाडीच्या पोलिसांनी शशांक रूपचंद शहा, त्याचा मुलगा संकेत शहा आणि भाऊ संजय रूपचंद शहा (सर्व रा.पिंपळनेर) या तिघां विरुद्ध गुन्हा दाखल केला. या संदर्भात शालन बजरंग पेटकर (वय ६५ रा.पिंपळनेर) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. शनिवारी दुपारी एक वाजेच्या सुमारास त्या शेतात पिकाला पाणी देत होत्या. त्यावेळी शशांक शहा यांच्यासह तिघेजण सामायिक बांधावर बसले होते. त्यापैकी संजय शहा याने पेटती काडी उसात टाकली. आग लागल्यानंतर पेटकर यांनी आरडा ओरड केली.तेव्हा तिघेजण पळून गेले. असे त्यांच्या फिर्यादी नमूद आहे. हवालदार माळी पूढील तपास करीत आहेत .



## सिध्दापूर येथील चोरट्यास अटक; ५ मोटार सायकली जप्त

### ग्रामीण पोलिसांची कामगिरी

✔ **सोलापूर** : स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी सिद्धापूर (ता.मंगळवेढा) येथील नितीन उर्फ बाल्या जालिंदर भजनावळे (वय ३४) याला नुकतीच अटक केली. त्याच्या ताब्यातून चोरीस केलेल्या पाच दुचाकी जप्त केले. जप्त केलेल्या दुचाकी कामती, अक्कलकोट दक्षिण, मंद्रूप, मोहोळ आणि नाशिक पोलीस ठाण्याच्या परिसरातून चोरल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले.

स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक सुहास जगताप यांना जिल्हा परिसरातून चोरीस गेलेल्या दुचाकी सिद्धापूर (ता.मंगळवेढा) येथील येथील भजनावळे हा चोरल्याची गुप्त माहिती मिळाली. त्याप्रमाणे मंगळवेढा येथील बोराळे नाका जवळ भजनावळे याला अटक केली. आणि त्याच्या ताब्यातून चोरीस गेलेल्या ५ दुचाकी जप्त केले. जप्त केलेल्या वाहनांची किंमत २ लाख ९ हजार इतकी असल्याचे सांगण्यात आले. स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक सुहास जगताप, यांचे मार्गदर्शनाखाली सहा. निरीक्षक अनिल सनगल्ले, पोलीस अंमलदार नारायण गोलेकर, धनाजी गाडे, मनसावाले, धनराज गायकवाड, अक्षय दळवी, समीर शेख, सहाय्यक फौजदार विजया मोहिते व कामतीचे प्रभारी अधिकारी अंकुश माने, साळवे यांनी बजावली आहे.

## नोकरीच्या आमिषाने तरुणाची दोन लाखांची फसवणूक

✔ **सोलापूर** : शासकीय नोकरी लावण्याचे अमिष दाखवून दोन लाख पंधरा हजार पाचशे रुपयांची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी सुवर्णा अमित अभ्यंकर (वय-३६, रा. स्वप्न ब्लॉक इंडियन मॉडेल स्कूल जुळे सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

त्यांच्या फिर्यादीवरून आशुतोष उमाकांत जोशी (रा. नेमिनाथ नगर, सांगली, सध्या राशी श्रध्दा बंगला नेताजी सुभाषचंद्र हाउसिंग सोसायटी, विजापूर रोड, सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी यांचे दीर संतोष जयंत अभ्यंकर यांचे जुने मित्र आशुतोष जोशी यांच्यासोबत फिर्यादीची जून २०२१ मध्ये ओळख झाली. त्यानंतर वरील संशयित आरोपींनी मी वैद्यकिय शिक्षण संशोधन विभागात मेडिकल कॉलेज उस्मानाबाद येथे नोकरी करतो.माझी खूप ओळखी आहे.मी नोकरीला देखील लावू शकतो.तसेच सोलापूर येथील वैद्यकिय शिक्षण संस्था संशोधन विभागात व उस्मानाबाद येथील नवीन मेडिकल कॉलेज झाले आहे.त्या ठिकाणी व्हॅकन्सी आहेत.नोकरीसाठी दोन लाख रुपये द्यावे लागतील असे म्हणाला. त्यावेळी तो फिर्यादीला अजून व्हॅकन्सी आहेत,अजून कुणाला नोकरीची आवश्यकता असल्या तर मला सांगा असे म्हणून फिर्यादी यांना वरील संशयित आरोपीवर विश्वास बसल्याने फिर्यादी यांचा भाऊ अजय रामभाऊ हांडेकर (रा.ठाणे) याला नोकरीची गरज असल्याने सुवर्णा अभ्यंकर यांनी आशुतोष जोशी यांना नोकरी बाबत संपर्क साधला. त्यावेळी फिर्यादी सुवर्णा व त्यांचा भाऊ अजय या दोघांना फिर्यादीच्या व्हाट्सअ‍ॅपवर नियुक्ती बाबतचे संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांचे बनावट सहींचे पत्र व पदस्थापनेबाबतचे अधिष्ठाता डॉक्टर वैश्यपायंस स्मृती महाविद्यालय सोलापूर यांच्यासईचे बनावट पत्र दिले.



आशुतोष जोशी यांनी फिर्यादी व फिर्यादीचा भाऊ यांना शासकिय नोकरी लावतो असे अमिष दाखवून फिर्यादी व फिर्यादीच्या भावाकडून वेळोवेळी दोन लाख पंधरा हजार पाचशे रुपये रक्कम घेऊन फसवणूक केली आहे. असे फिर्यादीत नमूद आहे. घटनेचा पुढील तपास फौजदार मुलाणी हे करीत आहेत.

## ६० हजार रुपयांच्या पेट्रोलची चोरी

✔ **सोलापूर** : पाकणी (ता. उत्तर सोलापूर) येथील हिंदुस्तान पेट्रोलियम डेपोच्या ५५० लिटर पेट्रोल चोरून नेल्याची घटना सोमवारी सकाळच्या सुमारास उघडकीस आली. या प्रकरणात तालुक्याच्या पोलिसांनी विकास विनायक साठे (वय ४० रा.पाकणी) आणि अन्य चार ते पाच जणाविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. हिंदुस्तान पेट्रोलियमच्या आवारातून ११ प्लास्टिकचा कॅन मधून ६१ हजाराचे पेट्रोल चोरीस जाताना आढळले होते.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



बाप्पा, इथं रस्त्याचा लै प्रॉब्लेम हाय, जपून या !

**कल्याण**

--------

**मेन बाजार**

--------

## भाजपच्या जिल्हाध्यक्षपदी आ. सचिन कल्याणशेट्टी

✔ **अक्कलकोट** : भारतीय जनता पक्षाच्या सोलापूर जिल्हाध्यक्षपदी अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची निवड करण्यात आली. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडून कल्याणशेट्टी यांना लेखी नियुक्तीपत्र देण्यात आले. सध्या राज्याच्या मंत्रीपदाच्या शर्यतीतही त्यांचे नाव आघाडीवर होते. पण त्यांच्या गळयात जिल्हाध्यक्षपदाची माळ पडली आहे. निवडीनंतर अक्कलकोट शहर व तालुका पदाधिकाऱ्यांनी जल्लोष केला.

याआधी अक्कलकोट तालुक्यातील स्वर्गीय आमदार बाबासाहेब तानवडे, शिवशरण दारफळे आणि बलभीम शिंदे यांनी भाजपचे जिल्हाध्यक्ष म्हणून काम पाहिले होते. आता अक्कलकोट तालुक्यास चौथ्यांदा आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना जिल्हाध्यक्षपद मिळाले. केंद्रात व राज्यात भाजपाची सत्ता असताना आमदार कल्याणशेट्टी यांना मिळालेले हे महत्त्वाचे पद तालुकावासियांची अपेक्षा वाढविणारे आहे. आ. सचिन कल्याणशेट्टी यांचा राजकिय प्रवास भरारी घेणारा आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या अत्यंत जवळचे ते समजले जातात. माजी सहकारमंत्री सुभाष देशमुख यांचे ते निकटवर्तीय मानले जातात. अक्कलकोट तालुक्यातील हन्नूर गावचे सरपंच, भाजपा जिल्हा सरचिटणीस, भारतीय जनता पार्टीचे अक्कलकोट तालुकाध्यक्ष, आमदार आणि आता थेट भाजपा जिल्हाध्यक्ष असा त्यांचा राजकिय प्रवास राहिला आहे.गोवा निवडणुकीत त्यांनी भाजपचे स्टार प्रचारक म्हणून काम केले होते. ज्या उमेदवाराचा प्रचार केला तो उमेदवारही निवडून आला. विजयी उमेदवाराने पहिला फोन सचिन कल्याणशेट्टी यांना केला होता.सोलापूर शासकिय विश्रामगृहावर येत्या दोन दिवसात भारतीय जनता पार्टीचे खासदार सर्व आमदारांच्या उपस्थितीत नूतन जिल्हाध्यक्ष सचिन कल्याणशेट्टी यांचा सत्कार करण्यात येणार आहे.



भाजप जिल्हाध्यक्ष पदासाठी अनेकांची नावे चर्चेत होती. भाजपाने अखेर जिल्ह्यातील आमदार असलेल्या आपल्या मूळच्या कार्यकर्त्याला पसंती दिली आहे. त्यामध्ये आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी बाजी मारली आहे.भाजपामधील युवा आमदाराला जिल्हाध्यक्ष पद मिळाल्याने अनेकांनी त्यांचे कौतुक केले आहे. आमदार कल्याणशेट्टी हे सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट मतदारसंघातून २०१९ मध्ये विधानसभेवर निवडून आले. त्यापूर्वी त्यांनी अनेक वर्षे अक्कलकोट तालुक्यात भारतीय जनता पार्टीची संघटना मजबूत करण्यासाठी प्रयत्न केले आहेत. त्यांनी पक्षात विविध संघटनात्मक जबाबदाऱ्याही सांभाळल्या आहेत.

कल्याणशेट्टी यांना प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. माजी जिल्हाध्यक्ष श्रीकांत देशमुख यांच्यावर एका महिलेने फसवणुकीचे आरोप केले होते. तसेच, त्यांचा बेडरुमधील व्हिडिओही सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. पक्षाची बदनामी नको म्हणून देशमुख यांनी पक्षश्रेष्ठींकडे राजीनामा सुपूर्द केला. लगेच भाजप पक्षश्रेष्ठींनी त्यांचा तडकाफडकी राजीनामा घेतला होता. तेव्हापासून भाजपचे जिल्हाध्यक्षपद रिक्त होते.

### ■ सर्वांना सोबत घेऊन जाणारा जिल्हाध्यक्ष मिळाला

आ.कल्याणशेट्टी यांच्या निवडीने एक अनुभवी, तरूण तडफदार जिल्हाध्यक्ष मिळाला आहे. याचा निश्चितच पक्षाला व तालुक्याला फायदा होईल. निवडीबद्दल शिष्य म्हणून परंपरेला अनुसरून आर्शिवाद व मनस्वी शुभेच्छा आहेत. त्यांनी तालुकाध्यक्ष म्हणुन चांगले काम केले आहे. सर्वांना सोबत घेऊन जाणारा जिल्हाध्यक्ष मिळाल्याने जबाबदारी योग्य रीतीने पार पाडतील, असा विश्वास खा.जयसिध्देश्वर महास्वामी यांनी व्यक्त केला.

### ■ संघटन मजबूत करण्यावर भर देणार

पक्ष नेतृत्वाने दिलेल्या जबाबदारी चा पक्षाचे आभार मानतो. येणाऱ्या काळात जिल्ह्यातील भाजपाचे संघटन अधिक मजबुत करण्यासाठी माझा प्रयत्न राहील. आगामी काळातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी सगळे तळागाळातील पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते, प्रमुख नेतेमंडळी यांना सोबत घेऊन भाजपाचा झेंडा कसा फडकत राहील यासाठी प्रयत्न करेन, असे मत आ.कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले.

# भारताची सहिष्णुता...

शेजारधर्म पाळला पाहिजे, अशी आपली संस्कृती आहे. शेजारचा कितीही वाईट वागला तरी त्याच्यावर संकट वा कठीण स्थिती आली तर त्याच्या मदतीसाठी धावून गेलेच पाहिजे. ही खरी सहिष्णुता आहे.पाकिस्तानसोबत भारताचे राजकीय वैर आहे. यात शंकाच नाही. पण मानवता पहाता भारताने त्या देशासाठी मदतीचा हात नेहमीच पुढे केला आहे हेही विसरता कामा नये. हे वैर भारताने निर्माण केलेले नाही तर त्याला कारणीभूत तोच देश आहे. दहशतवादाला खतपाणी घालून पाकचे सत्ताधीश आणि लष्करशाहीकडून जम्मू-काश्मीरमध्ये निष्कारण दहशत निर्माण करत आहे. पाकने दहशतवाद नष्ट केला पाहिजे ही भारताची साद आहे, पण पाक त्याला प्रतिसाद देत नाहीय. काही दिवसांपूर्वी पाकिस्तानात ढगफुटीने हाहाकार माजवला. त्यातून गंभीर पूरस्थिती निर्माण झाली. शेकडो लोक मृत्युमुखी पडले. पुरामुळे शेतीत उगवलेली पिके उद्ध्वस्त झाली. अन्नधान्यासह, भाजीपाल्यांचे दर मोठ्या प्रमाणात वाढले. शेकडो कुटुंबे उघड्यावर आहेत. तेथील सर्वसामान्य जनता त्रस्त झाली आहे. हा देश मागील काही महिन्यांपासून अनपेक्षित संकटांचा सामना करत आहे. पाकिस्तानची आर्थिक स्थिती अतिशय हालाकीची आहे. यावर अद्याप कोणताही उपाय सापडलेला नाही. बलुचिस्तान आणि सिंधमध्ये पुरामुळे टोमॅटो, कांदा आणि इतर भाज्यांची हजारो एकर पिके उद्ध्वस्त झाली आहेत. पाकिस्तान सरकार वाघा बॉर्डरवरुन भारतातून टोमॅटो आणि कांद्याची आयात करण्याचा विचार करत असल्याची माहिती आहे. बलुचिस्तान येथील ताफ्तान बॉर्डरद्वारे इराणमधूनही टोमॅटो आणि कांद्याची ऑर्डर करण्याचा पर्याय आहे, पण इराण सरकारने आयात-निर्यात टॅक्समध्ये मोठ्या प्रमाणात वाढ केली आहे, त्यामुळे हा पर्याय पाकिस्तानला महाग पडू शकतो. पुरामुळे सिंध प्रांतातील सरकारी गोदामांमध्ये ठेवलेला २० लाख



टन गहू वाया गेला आहे. या संकटामुळे आगामी काळात पाकिस्तानात गहू आणि इतर धान्याच्या किमतीही वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. भारत सरकारने काश्मीरला दिलेला विशेष दर्जा रद्द केल्यानंतर पाकिस्तानने देशातून होणारी आयात कमी केली होती.इथेही त्या देशाने आपली मस्ती दाखवून दिली. आता वाईट वेळ आल्यानंतर आयातीचे धोरण पाकला बदलणे भाग पडत आहे. पाकचे केंद्रीय अर्थमंत्री मिफ्ताह इस्माईल यांना विचारले असता, त्यांनी भारताकडून भाज्या व इतर खाद्यान्न आयात करण्याच्या पर्यायाचा विचार केला जाईल, असे उत्तर दिले. पाकवर ओढवलेल्या संकटाविषयी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त केले. जर पाकिस्तानकडून मदतीचा हात पुढे आला तर भारत आपला हात त्यांच्या हातात नक्कीच देईल. २०१४ नंतर नैसर्गिक आपत्तीमुळे पाकिस्तानला मदत करण्याची ही पहिलीच वेळ असेल. यापूर्वी २००५ आणि २०१० मध्ये तत्कालीन यूपीए सरकारच्या काळात, भारताने पाकिस्तानला मदत केली होती. भारतीय उपखंडातील ज्या ज्या देशांवर संकट ओढवले, त्यावेळी भारताने मदत दिली. नेपाळमध्ये प्रलयंकारी भूकंप झाल्यानंतर पहिली मदत भारताने केली. श्रीलंकेवर आर्थिक अरिष्ट ओढवले. त्यावेळी भारताकडून अन्नधान्य पाठवण्यात आले तसेच इंधनही दिले. रोख रकमेच्या रूपात हजारो कोटींचा निधी मोदींनी देऊन टाकला. त्याबद्दल तिथल्या जनतेने भारतीयांचे आभार मानले. हा भारताच्या सहिष्णुतेचा विजय आहे. अफगाणिस्तान व भारत यांच्यात पारंपरिक मैत्री आहे. तिथली लोकशाहीची राजवट उलथवून तालिबान्यांनी सत्ता हस्तगत केली तरी देखील मोदींनी त्या देशाशी संबंध काय ठेवले. कारण भारताची त्या देशात मोठी गुंतवणूक आहे. मोठ्या प्रमाणात भारतीय मजूर तिथे आहे. मसाल्याचा जिनसा भारत तेथूनच आयात करत असतो. कोरोनाच्या संकटात हा देश सापडला होता. तेव्हा अफगाणला औषध पुरवठा करण्यावर भारताने प्राधान्य दिले होते. त्याविषयी तालिबान सरकारने भारताचे विशेष आभार मानले होते. पाकने आपल्या वागणुकीत बदल केल्यास भारत त्या देशाला नक्कीच मदत करेल. दोन वर्षांपूर्वीचे काही अनुभव सांगता येतील. पाकमधील काही नागरिकांना भारतात वैद्यकिय उपचार घ्यायचे होते. त्यांना भारत सरकारने तात्काळ मान्यता दिली. ते बरे होऊन आपल्या देशात गेले. रशिया-युक्रेन युद्धात युक्रेनच्या सीमेवर पाकचे नागरिक अडकले होते. युक्रेन आणि भारत यांची मैत्री सर्वश्रुत आहे. पाकच्या नागरिकांनी हाती तिरंगा ध्वज घेतल्यानंतर त्यांना कुठलाही धोका झाला नाही. ते सुखरूप आपल्या देशात पोहोचले.आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताने कुठल्याही देशाशी वैर घेतलेले नाही. कारण भारताकडे तितकी सामर्थ्यवान सहिष्णुता आहे. पण पाकचे सत्ताधीश त्यातून बोध घ्यायला तयार नाहीत. हेच पाकीच्या जनतेचे दुर्दैव आहे.

## अध्यात्म

# श्रीगणेश चतुर्थी व्रताविषयीचे शास्त्र

**श्री गणेशचतुर्थी हा हिंदूंचा मोठा सण आहे. श्री गणेश चतुर्थीला तसेच श्री गणेशोत्सवाच्या दिवसात गणेशतत्त्व नेहमीच्या तुलनेत पृथ्वीवर १ सहस्र पटीने कार्यरत असते. या काळात केलेल्या श्री गणेशाच्या उपासनेने गणेशतत्त्वाचा अधिक लाभ होतो. सुखकर्ता, विघ्नहर्ता आणि अष्टदिशांचा अधिपती असलेल्या श्री गणेशाची पूजा भावपूर्ण होऊन त्याचा कृपाशीर्वाद मिळावा, असाच सर्व गणेशभक्तांचा प्रयत्न असतो. श्री गणेश चतुर्थीस आचरण्यात येणाऱ्या व्रताविषयीचे शास्त्र या लेखातून समजून घेऊया. श्री गणेश चतुर्थीनिमित्त नवीन मूर्तीचे प्रयोजन, श्री गणेश चतुर्थीला पुजावयाची मूर्ती कशी असावी आणि ही शास्त्रोक्त पद्धतीने ही मूर्ती घरी कशी आणावी? श्री गणेश चतुर्थी यादिवशी चंद्रदर्शन करणे वर्ज्य असणे यामागील कारण अशा अनेक प्रश्नांची उत्तरे या लेखात मिळतील.**

श्री गणेश चतुर्थीस आचरण्यात येणारे व्रत हे 'सिद्धिविनायक व्रत' या नावाने ओळखले जाते. वास्तविक हे व्रत सर्व कुटुंबात होणे क्रमप्राप्त आहे. सर्व भाऊ एकत्र रहात असतील म्हणजेच त्यांचा द्रव्यकोश (खजिना) आणि पाकनिष्पत्ती (चूल) एकत्र असेल, तर सर्वांत मिळून एक मूर्ती पुजली तरी चालते; पण ज्यावेळी द्रव्यकोश आणि पाकनिष्पत्ती कोणत्याही कारणास्तव विभक्त असतील तर त्यांनी आपापल्या घरी स्वतंत्र गणेशमूर्ती पुजावी. ज्या कुटुंबात एकच गणपती बसवण्याची दृढ परंपरा आहे, त्या कुटुंबात ज्या भावामध्ये देवाविषयी अधिक भाव आहे, त्याच्याच घरी गणपती बसवावा.

**नवीन मूर्तीचे प्रयोजन :** पूजेत गणपती असला, तरी गणपतीची नवीन मूर्ती आणावी. श्री गणेश चतुर्थीच्या वेळी गणेशलहरी पृथ्वीवर खूप जास्त प्रमाणात येतात. त्यांचे आवाहन नेहमीच्या पूजेतील मूर्तीत केल्यास तिच्यात खूप जास्त शक्ती येईल. जास्त शक्ती असलेल्या मूर्तीची साग्रसंगीत पूजाअर्चा वर्षभर नीटपणे करणे कठीण जाते; कारण त्यासाठी कर्मकांडातील बंधने पाळावी लागतात. म्हणून गणेशलहरींचे आवाहन करण्यासाठी नवीन मूर्ती वापरतात आणि ती मूर्ती नंतर विसर्जित करतात.

**श्री गणेश चतुर्थीला पुजावयाची मूर्ती कशी असावी? :** चिकणमाती किंवा शाडूची माती यांपासून मूर्ती बनवावी, असा शास्त्रविधी आहे. अन्य वस्तूंपासून (उदा. प्लास्टर ऑफ पॅरिस, कागदाचा लगदा) मूर्ती बनवणे, हे धर्मशास्त्रविरोधी तसेच पर्यावरणाला घातक आहे. मूर्तीची उंची अधिकाधिक एक फूट ते दीड फूट असावी. मूर्ती शास्त्रानुसार बनवलेली, पाटावर बसलेली, डाव्या सोंडेची अन् नैसर्गिक रंगांनी रंगवलेली असावी. परंपरा किंवा आवड याप्रमाणे गणेशमूर्ती आणण्यापेक्षा धर्मशास्त्रसंमत गणेशमूर्ती पुजावी.

**शास्त्रोक्त विधी आणि रूढी यांचा अवधी :** भाद्रपद शुद्ध चतुर्थीस मातीचा गणपती करतात. तो डाव्या हातावर ठेवून तेथेच त्याची सिद्धिविनायक या नावाने प्राणप्रतिष्ठा आणि पूजा करून लगेच विसर्जन करावे असा शास्त्रविधी आहे; पण मनुष्य हा उत्सवप्रिय असल्याने एवढ्याने त्याचे समाधान होईना; म्हणून दीड, पाच, सात किंवा दहा दिवस श्री गणपती ठेवून त्याचा उत्सव करू लागला. बरेच जण (ज्येष्ठा) गौरीबरोबर गणपतीचे विसर्जन करतात. एखाद्याच्या कुलाचारात गणपती पाच दिवस असेल आणि तो त्याला दीड किंवा सात दिवसांचा करावयाचा असला, तर तो तसे करू शकतो. यासाठी अधिकारी व्यक्तिस विचारण्याची जरुरी नाही. रूढीप्रमाणे पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या, सहाव्या, सातव्या किंवा दहाव्या दिवशी श्री गणेशविसर्जन करावे.

**मूर्तीची आसनावर स्थापना :** पूजेपूर्वी ज्या पाटावर मूर्तीची स्थापना करायची असते, त्यावर तांदूळ (धान्य) ठेवून त्यावर मूर्ती ठेवतात. आपापल्या प्रथेप्रमाणे थोडे तांदूळ किंवा तांदुळाचा लहानसा ढीग करतात. मूर्तीत गणपतीचे आवाहन करून तिची पूजा केल्याने मूर्तीत शक्ती निर्माण होते. त्या शक्तीमुळे तांदूळ भारीत होतात. सारख्या कंपनसंख्येच्या दोन तंबोऱ्याच्या दोन तारा



असल्या तर एकीतून नाद काढल्यास तसा नाद दुसऱ्या तारेतूनही येतो. त्याचप्रमाणे मूर्तीखालील तांदुळात शक्तीमुळे स्पंदने निर्माण झाली की, घरातील तांदुळाच्या साठ्यातही शक्तीची स्पंदने निर्माण होतात. अशातऱ्हेने शक्तीने भारीत झालेले तांदूळ वर्षभर प्रसाद म्हणून खाता येतात.

**श्री गणेशचतुर्थीसाठी पुजावयाची मूर्ती घरी कशी आणावी? :** श्री गणेशचतुर्थीसाठी पुजावयाची मूर्ती शक्यतो आदल्या दिवशीच आणून ठेवावी. श्री गणेशाची मूर्ती घरी आणण्यासाठी घरातील कर्त्या पुरुषाने इतरांसह जावे. मूर्ती हातात घेणाऱ्याने हिंदू वेशभूषा करावी म्हणजे अंगरखा (सदरा)-धोतर किंवा अंगरखा-पायजमा परिधान करावा. मूर्ती आणताना तिच्यावर रेशमी, सुती किंवा खादीचे स्वच्छ वस्त्र घालावे. मूर्ती घरी आणताना मूर्तीचे मुख आणणाऱ्यांकडे आणि पाठ समोरच्या दिशेस असावी. मूर्तीच्या समोरच्या भागातून सगुण तत्त्व तर पाठच्या भागातून निर्गुण तत्त्व प्रक्षेपित होत असते. मूर्ती हातात धरणारा हा पूजक असतो. तो सगुणातील कार्याचे प्रतीक आहे. मूर्तीचे मुख त्याच्याकडे केल्यामुळे त्याला सगुण तत्त्वाचा लाभ होतो तर इतरांना निर्गुण तत्त्वाचा लाभ होतो. श्री गणेशाचा जयजयकार आणि भावपूर्ण नामजप करत मूर्ती घरी आणावी. घराच्या उंबरठ्याबाहेर उभे रहावे. घरातील सुवासिनींने मूर्ती आणणाऱ्याच्या पायांवर दूध आणि नंतर पाणी घालावे. घरात प्रवेश करण्यापूर्वी मूर्तीचे मुख समोरील दिशेस करावे. यानंतर मूर्तीचे औक्षण करून ती घरात आणावी.

सजवलेल्या मखरात पाटावर किंवा चौरंगावर थोड्या अक्षता घालून त्यावर मूर्ती ठेवावी. सजावट पूर्ण व्हायची असल्यास मूर्ती अन्य सुरक्षित जागी ठेवून सजावट लवकरात लवकर पूर्ण करावी. मूर्तीला मखरात बसवल्यानंतर मूर्ती हलणार नाही किंवा मूर्तीस काही अपाय होणार नाही, याची काळजी घ्यावी. मूर्तीवर एखादे वस्त्र किंवा रुमाल घालून ती झाकून ठेवावी. उंदराची मूर्ती वेगळी असल्यास तीही सुरक्षित ठेवावी. मूर्तीचे मुख पश्चिम दिशेला असेल अशा पद्धतीने ठेवावी, तसे शक्य नसल्यास पूजकाने पूजा करताना स्वतः चे तोंड दक्षिण किंवा पश्चिम दिशेला येणार नाही अशा पद्धतीने बसावे. मूर्तीचे तोंड पूर्व किंवा उत्तर दिशेला असेल, तर पूजकाने मूर्तीच्या डाव्या हाताला काटकोनात बसावे, म्हणजे पूजकाचे मुख उत्तरेला किंवा पूर्वेला होईल. दक्षिण दिशेला मूर्तीचे तोंड असू नये. दक्षिणेकडे तोंड साधारणपणे उग्र देवतांचे असते, उदा. काली, हनुमान, नरसिंह इत्यादी. गणपतीची जी मूर्ती आपण आणतो, ती उग्र नसून प्रसन्न किंवा शांत असते. म्हणूनच शक्यतो तिला दक्षिणमुखी ठेवू नये.

**मध्यपूजाविधी :** गणपती घरी असेपर्यंत प्रतिदिन सकाळी आणि संध्याकाळी प्राणप्रतिष्ठा सोडून गणपतीची नेहमी पूजा करतो तशी पूजा करावी आणि शेवटी आरत्या आणि मंत्रपुष्प म्हणावे. गणेशमूर्तीच्या प्रतिष्ठापनेनंतर प्रतिदिन करावयाची पंचोपचार पूजा करावी.

**उत्तरपूजा व विसर्जन:** गणपतीच्या विसर्जनापूर्वी ही पूजा करायची असते. विशिष्ट मंत्र म्हणून पुढे दिल्याप्रमाणे पूजा करावी - आचमन, संकल्प, चंदनार्पण, अक्षतार्पण, पुष्पार्पण, हरिद्रा (हळद)-कुंकूमार्पण, दूर्वार्पण, धूप-दीप दर्शन आणि नैवेद्य. यानंतर आरती करून मंत्रपुष्पांजली समर्पावी. सर्वांनी गणपतीच्या हातावर अक्षता द्याव्या आणि मूर्ती उजव्या हाताने हालवावी. उत्तरपूजेनंतर मूर्तीचे जलाशयात विसर्जन करतात. विसर्जनाला जाताना गणपतीबरोबर दही, पोहे, नारळ, मोदक वगैरे शिदोरी द्यावी. जलाशयाजवळ पुन्हा आरती करावी आणि मूर्ती शिदोरीसह पाण्यात सोडून द्यावी.

श्री गणेश चतुर्थी या दिवशी चंद्रदर्शन करणे वर्ज्य असणे - श्री गणेश चतुर्थीला 'कलंकित चतुर्थी' असेही म्हणतात. या चतुर्थीला चंद्र पाहणे वर्जित आहे. चुकूनही चतुर्थीचा चंद्र दिसल्यास 'श्रीमद्भागवताच्या'च्या १० व्या स्कंधाच्या ५६-५७ व्या अध्यायात दिलेली 'स्यमंतक मण्याची चोरी' ही कथा आदराने वाचली किंवा ऐकली पाहिजे. भाद्रपद शुक्ल तृतीयेचा किंवा पंचमीचा चंद्र पहावा. यामुळे चतुर्थीला चंद्रदर्शन झाल्यास त्याचा अधिक धोका रहात नाही. चुकून चंद्रदर्शन झाल्यास पुढील मंत्राने अभिमंत्रित केलेले पवित्र जल प्राशन करावे. या मंत्राचा २१, ५४ किंवा १०८ वेळा जप करावा.

**सिंहः प्रसेनमवधीत् सिंहो जाम्बवता हतः ।**
**सुकुमारक मा रोदीस्तव ह्येष स्यमन्तकः।।**
**(- ब्रह्मवैवर्त पुराण, अध्याय ७८)**

**अर्थ :** हे सुंदर सुकुमारा, या मण्यासाठी सिंहाने प्रसेनला मारले आहे आणि जांबुवंताने त्या सिंहाचा संहार केला आहे; म्हणून तू रडू नकोस. आता या स्यमंतक मण्यावर तुझाच अधिकार आहे.

**- संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'गणपती'**
**संकलक : श्री. हिरालाल तिवारी.**

## टुडेज ब्लॉग

# सहस्रकातील कवयित्री : अमृता प्रीतम!

**भारतीय साहित्यातील एक लखलखीत नाव, साहित्य अकादमी पुरस्कार मिळविणाऱ्या पहिल्या महिला, साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या, सहस्रकातील कवयित्री आवाज-ए-पंजाब' अमृता प्रीतम यांचा ३१ ऑगस्ट हा जन्म दिन. पंजाबी कवयित्री, साहित्यिक असलेल्या अमृता यांनी सर्वच भाषांवर आपला ठसा उमटवला. हळव्या मनाच्या असलेल्या अमृता या बंडखोर सुद्धा होत्या. भारतीय साहित्य विश्वाला अमृता प्रीतम यांनी खऱ्या अर्थानं सर्वसमावेशक उंचीवर नेण्याचे कार्य केले आहे. त्यांच्या १०२ व्या जन्म दिनानिमित्त....**

पंजाबी आणि हिंदी भाषेत विपुल लेखन करणाऱ्या, ज्यांच्या साहित्यात मुक्त व विचारी स्त्रीचा आवाज ऐकू येतो, ज्यांनी जीवनात तसेच लेखनात बंडखोरी केली व आलेले अनुभव अत्यंत प्रामाणिकपणे शब्दबद्ध केले, अशा सहस्रकातील कवयित्री अमृता प्रीतम यांचा जन्म पंजाबमधील गुजरांवाला या गावी ३१ ऑगस्ट १९१९ रोजी झाला. त्यांचे वडील कर्तारसिंह 'पीयूष' या नावाने कविता लेखन करीत असत. 'बालका साधू' म्हणून विरक्त आयुष्य स्वीकारलेल्या वडिलांनी संस्कृत व ब्रज भाषेचे अध्ययन केले होते तर ब्रज भाषेत कविता लिहीत होते. विरक्त वृत्तीचे असले तरी समाज मनाची जाण असलेले ते गृहस्थ होते. अमृता दहा -अकरा वर्षाच्या असताना त्यांच्या आईचे निधन झाले व त्या पोरक्या झाल्या. हळूहळू त्यांचे मन स्वप्नाळू बनत गेले. अनेक वर्षे त्या स्वप्नामध्येच जगत राहिल्या. घरात वडिलांशिवाय कुणी नव्हते. जगापासून या अल्लड मुलीला वाचविण्यासाठी म्हणून तिची शेजाऱ्यांशी, मित्र-मैत्रिणींशी कोणाशीही ओळख नको या वडिलांच्या धारणेमुळे अमृताजींचे बालपण एका वेगळयाच कोंडलेल्या स्थितीत गेले. आणि मग त्या एकटेपणात कविता करू लागल्या. तथापि, परंपरा वादी शीख घराण्यातील धार्मिक वृत्तींच्या वडिलांना त्यांनी केवळ धार्मिक कविताच कराव्यात असे वाटायचे. अशा प्रकारच्या अटी-निर्बंधामुळे निष्फळ प्रेमाच्या, दबलेल्या भावनांनी कल्पनेशी, स्वप्नांशी नाते जोडले आणि यातूनच त्यांच्या कवितांची निर्मिती झाली.



१९३६ मध्ये वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांनी अमृत लहरे (अमर वेव्हज) हा कवितांचा पहिला काव्यसंग्रह प्रकाशित केला. लहानपणा पासूनच व्यस्त असलेल्या संपादक प्रीतम सिंगशी त्यांचे बालपणीच लग्न झाले आणि अमृत कौर यांचे नाव बदलून अमृता प्रीतम झाले. अमृता-इमरोज यांचे ४० वर्षांचे सहजीवन, प्रेम, मैत्री, समाजाची त्या विरुद्धची प्रखर प्रतिक्रिया, कुटुंबाच्या, मुलांच्या अपेक्षा, अमृताजींनी न लपविलेले त्यांचे साहीर लुधियानवी विषयीचे प्रेम या सगळयांची त्यांना मोजावी लागलेली किंमत आणि त्यातून केलेले आणि कितीही विरोध झाला तरी त्यांना आपोआप मिळत गेलेले सन्मान हे सर्वच विलक्षण आहे. भारतीय ज्ञानपीठाचा १९८१ चा साहित्य पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. त्यांचा काव्यसंग्रह 'कागज ते कैनव्हास' हा १९६५ ते १९७४ या कालावधीतील प्रकाशित भारतीय भाषेतील सृजनात्मक साहित्यातील सर्वश्रेष्ठ साहित्यकृती म्हणून घोषित करण्यात आला. आशापूर्णादेवी नंतर ज्ञानपीठ पुरस्कार मिळविणाऱ्या त्या दुसऱ्या लेखिका होत्या.

'रसीदी टिकट' या त्यांच्या आत्मवृत्ताच्या प्रस्तावनेत त्या लिहितात सहज बोलता बोलता खुशवंतसिंह मला म्हणाले तुझं आयुष्य तरी काय ग ? एखादी लहानशी घटना. बस लिहायचे म्हंटले तरी साध्या पावतीच्या तिकिटामागे लिहिले जाईल. मग कविता, कादंबऱ्या यांच्या कच्च्या जमाखर्चाची पावती पक्की करण्यासाठी त्यांनी रसीदी टिकट' हे आत्मचरित्र लिहिले. भारताबरोबर पाकिस्तानातही लोकप्रिय असणाऱ्या अमृता यांच्या 'पिंजर' या साहित्यकृतीवर चित्रपट निर्माण झाला होता. अमृता यांची कविता चित्रासारखी सुंदर आहे. मग ती वेदना व्यक्त करणारी असो की दिलासा देणारी ! ३१ ऑक्टोबर २००५ रोजी त्या अनंतात विलीन झाल्या असल्या तरी साहित्याच्या रूपाने त्या आजही आपल्यात आहेत. त्यांना भावपूर्ण आदरांजली !!

**- प्रा. विजय कोष्टी, सांगली.**

## बोधकथा

### सत्कृत्य



एका वनात एक पारधी राहत होता. त्याने खूप वन्य प्राण्यांची हत्या केली होती. त्याची चाहूल लागली तरी वन्यप्राणी भीतीने प्राणी थरथर कापत असत. एकेदिवशी तो आपल्या शिकारीच्या शोधात असताना एका बेलपत्राच्या झाडावर चढला.

खूप वेळ झाला तरी एकही शिकार त्याच्या हाती लागली नाही. तो खूप चिडला व बेलपत्राच्या झाडाचे एक एक पान खाली टाकू लागला. बराच वेळ हा त्याचा उद्योग चालू होता. झाडाच्या बुंध्याशी बेलपत्राचा हा मोठा ढीग तयार झाला पण हे पारध्याला माहीत नव्हते. त्या झाडाखाली एक महादेवाची पिंड होती. त्या पिंडीवर बेलाच्या पानांचा ढीग पाहून महादेव प्रसन्न झाले व ते पारध्याच्या समोर प्रकट झाले. त्यांना समोर पाहून पारधी आश्चर्यचकित झाला व म्हणाला,''महादेवा, मी खूप क्रूर आहे, अनेक वन्यप्राणी मारले आहेत, खूप हिंसा केली आहे, पाप खूप केले पण पुण्याचे एकही काम केलेले मला तरी आठवत नाही तरी पण आपण मला कसे बरे प्रसन्न झालात? यावर महादेव म्हणाले,''तू हिंसक आहेस, तुझ्या नकळत का होईना तू माझी पूजा केली आहेस. पूजा-प्रार्थना हे असे काम आहे की ते चुकून जरी घडले तरी त्याचे चांगलेच फळ मिळते. जर चुकून प्रार्थनेचे फळ इतके चांगले मिळत असेल तर नेहमी तर सत्कार्य केलेस तर किती फळ मिळेल?

**तात्पर्य :- एका सत्कृत्यामुळेदेखील आपले आयुष्य बदलून जाऊ शकते.**

## जन्म हा अखेरचा

### अकायस्थल - २



कारण त्याने युक्तिवाद केलेला असला तरी त्याचे स्वतःचे ओझे डोक्यावरच आहे, ही वस्तुस्थिती आहे. आपले सारे ओझे खरे तर परमात्माच वाहात असतो. परंतु आपण मात्र म्हणत असतो - मी नसलो तर कसे होणार? तुमच्यासारखे कित्येक लोक आले आणि गेले, परंतु जगाचा कारभार चाललेलाच आहे. तुमचा बाप गेला, आजा गेला, पणजोबा गेला, खापरपणजोबा गेला. तरीही जग आपल्या गतीने चाललेलेच आहे. उद्या तुम्ही जाल, तुमचा मुलगा जाईल, मुलाचा मुलगा जाईल. तरी या जगाचे काही बिघडणार नाही. जग चालतच राहील. म्हणून एखादे कार्य करीत असताना हे मी करीत आहे अशी भावना न ठेवता माझ्याकडून हे कार्य करून घेतले जात आहे अशी भावना ठेवावी. असे घडले तर तुमच्यावर कोणतेही ओझे पडणार नाही. परंतु अज्ञानी माणसे मात्र, अकारण घोड्यावर बसून डोक्यावर ओझे वाहणाऱ्या माणसाप्रमाणे ओझे वाहतात.

**(क्रमशः) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## जनमानस

### लोकोपयोगी उपक्रम करावेत

अनेक वर्षांपासून गणेशोत्सव घरगुती व सार्वजनिक स्वरूपात साजरा होतो गेल्या दोन वर्षांपासून कोरोनामुळे बंधने आली. तरीही बदलत्या परिस्थितीत उत्साहात साजरा होताना भाविकांना नवीन उमेद, ऊर्जा मिळते. अनेक समस्या भेडसावत असताना बाप्पा मदत करेल व प्रयत्नांना यश देईल हा विश्वास असतो. मानवी जीवनात विपरीत परिस्थिती येते, तेव्हा देवावर भरवसा ठेवून जिद्दीने वाटचाल केली जाते. श्रीगणेशाच्या कृपेने महागाई, बेरोजगारी या समस्या दूर व्हाव्यात तसेच जगभरात शांतता समृद्धी यावी, हीच प्रार्थना. यानिमित्ताने मनांमनांत नवी उमेद, सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. त्याचा उपयोग नवीन लोकोपयोगी उपक्रम करण्यासाठी व्हावा. सद्यस्थितीत अनेक समस्या असताना केवळ उत्सवी स्वरूप असण्यापेक्षा त्यातून वर्षभर चालणारे चांगले उपक्रम असावेत ही अपेक्षा. **- प्रफुल्लचंद्र काळे, नाशिक.**

### नियमांचे उल्लंघन होऊ देऊ नये

नोएडा येथील सुपरटेक एमेराल्ड हाउसिंग सोसायटीअंतर्गत अपेक्स टॉवर आणि सेयेन टॉवर या ३१+ मजली इमारती बेकायदेशीररीत्या बांधल्या गेल्या होत्या. जिल्ह्यातील अधिकाऱ्यांच्या कारस्थानातून उभारताना नियमांचे उल्लंघन केले गेल्याच्या कारणांनी न्यायालयाच्या आदेशानुसार या इमारती जमीनदोस्त करण्यात आल्या. आवश्यक नियमांचे पालन न करता एवढ्या उंच टॉवर्सचे बांधकाम करण्यामागे एक दोन नव्हे तर बरीच अधिकारी मंडळी व इतरांचे हितसंबंध असावेत या शंकेला जागा नाही. बांधकाम जमीनदोस्त करताना आसपास असलेल्या इमारती रिकाम्या करून त्यांतील रहिवासी, वाहने, पाळीव प्राणी यांना सुरक्षित स्थळी हलवावे लागले. काही तासांकरिता त्या परिसरावरून जाणारे विमानोड्डाणांचे मार्ग बदलले गेले. आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने स्फोटके वापरून पाडण्यात आल्या. त्यावेळी स्फोटकांच्या धुराने दूरवरच्या परिसरात झालेले प्रदूषण, तसेच इमारती जमीनदोस्त झाल्यावर इमारतींच्या बांधकाम साहित्याचा जमा झालेल्या ढिगाऱ्याची विल्हेवाट लावताना जे काही प्रदूषण होणार आहे त्यास जबाबदार कोण असतील त्यांच्यावर देखील कायदेशीर कारवाई करण्यात गंभीरता असावी. नोएडा, दिल्ली परिसरात प्रदूषणाचे प्रमाण इतर शहरांच्या तुलनेत अधिक असल्याची वृत्ते येत असतात. बेकायदेशीररीत्या बांधकामे देशाच्या बहुतेक शहरांमध्ये होत असतात त्यातील काही अधिकृत/कायदेशीर केली जातात. किंवा तिथे बांधकाम कोसळण्याव्यतिरिक्त अन्य अपघात घडताच किंवा आगी लागण्याचे प्रकार होताच त्या बांधकामांच्या अधिकृततेसंबंधी तपास, चौकश्या सुरू होतात. व्यवसाय, धंद्यासाठी व्यापारी आणि निवासासाठी निवासी संकुलात जागा घेऊन स्थिरावणारे नागरिक हे नेहमीच पैशासाठी कोणत्याही नियमांना न जुमानणाऱ्यांकडून वेठीस धरले जातात. तपास, चौकश्या, कोर्टकचेऱ्या यांनाही त्यानिमित्ताने व्यस्त राहता येते. परंतु बोध मात्र कोणीच घेत नाही याचे दुःख होत राहते. **- राजन पांजरी, जोगेश्वरी.**

# श्री गणेशाची पार्थिव पूजन विधी

**आनंदाचे स्थान असलेला श्री गणेशदेव आज आपल्या घरोघरी येत आहे. याची शास्त्रोक्त स्थापना व्हावी, असे प्रत्येकालाच वाटत असते. परंतु काही ठिकाणी गुरुजी पोहोचत नसल्यामुळे, आपल्या पद्धतीप्रमाणे किंवा आपल्या भक्तिभावाप्रमाणे आपण या पार्थिव गणेशाची प्रतिष्ठापणा करीत असतो.**

प्रत्येकाला बाप्पा श्री गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना विधीपूर्वक करता यावी म्हणून, किमान संक्षिप्त स्वरूपाचे विधी आपण देत आहोत. शास्त्राप्रमाणे तुळशी कुंडीतील माती, डाव्या हातावर उजव्या हाताने त्या मातीचा गणपती साकारायचा आणि त्याच गणेशाची पार्थिव गणेश पूजा तिथेच नैवेद्य अर्पण करून लगेचच विसर्जन करावयाचा अशी पद्धत आहे. परंतु आपण सर्वचजण मूर्तिपूजक आणि उत्साही असल्यामुळे दहा दिवसांचा गणेशोत्सव नेहमीच मोठ्या भक्तिभावाने साजरा करतो. काही वर्षांपूर्वी या उत्सवामुळे जनमानसात जागरूकता निर्माण व्हावी म्हणून या उत्सवाला सामाजिक स्वरूप देण्यात आले. त्या गणेशाने त्याकाळी लोकांना जागृत करून आपल्याला स्वातंत्र्यही मिळवून दिले. परंतु याचे स्वरूप खूप मोठे झाले आहे. मंडपामध्ये आणलेल्या मूर्तीही खूपच भव्य दिव्य स्वरूपाच्या निर्माण होत आहेत. सर्वांनी एकत्र येण्याचे हे उत्तम साधन आहे.

घरोघरी किंवा सार्वजनिक गणपतींची प्रतिष्ठापना करण्यासाठी प्रत्येक वेळी गुरुजी उपलब्ध होतातच असे नाही. तेव्हा आपल्याला स्वतःला किमान संक्षिप्त तरी प्रतिष्ठापनेचा विधी करता यावा व मूर्तीमध्ये चैतन्य निर्माण होण्यासाठी संक्षिप्त गणेश प्रतिष्ठापनेचा विधी देत आहोत. देवाला नमस्कार करून गुरुजींना व घरातील वडील मंडळींना नमस्कार करावा व नंतर आसनावर पूजेसाठी बसावे व पूजेला आरंभ करावा. देशकालाचा उच्चार करून, श्री परमेश्वर प्रीत्यर्थं अस्माकं सकल कुटुंबानां परिवारानां, द्विपद-चतुष्पाद सहितानां, क्षेम -स्थैर्य-आयु:आरोग्य ऐश्वर्य अभी वृद्यर्थं, प्रतिवार्षिक विहितं, पार्थिव सिद्धिविनायक देवता प्रीत्यर्थं, यथा ज्ञानेन, यथा मिलीत उपचार द्रव्येन, पुराणोक्त मंत्रौ : प्राण प्रतिष्ठापन पूर्वकं , ध्यान-आवाहनाधि पूजनमहं करिष्ये असा संकल्प करून,

**वक्रतुंड महाकाय**
**सूर्यकोटी समप्रभ।**
**निर्वीघ्नम कुरुमे देव**
**सर्वकार्येषु सर्वदा।।**

असे स्मरण करावे.

दीप- कलश- घंटा- पूजन आदी करावे व प्राणप्रतिष्ठा करावी. आपला डावा हात आपल्या हृदयावर व आपला उजवा हात



देवाच्या हृदयाला स्पर्श करावा व पुढीलप्रमाणे प्राणप्रतिष्ठापना मंत्र म्हणावा, 'अस्य श्री प्राण प्रतिष्ठा मंत्रस्य ब्रह्म विष्णू महेश्वरा ऋषः। ऋग्यजु: सामाथर्वाणि छंदांसि परा प्राणशक्ती देवता, आं बीजम्, ऱ्हीं शक्ति:, क्रों किलकम् । अस्यां मृन्मयीमूर्तौ प्राणप्रतिष्ठापने विनियोग:।। १) आं ऱ्हीं क्रों अं, यं, रं, लं, वं, शं, षं, सं, हं, ळं, क्षं, अ:,।। क्रों ऱ्हीं आं हंस:सोहं।। **।। अस्यां मूर्तौ प्राण इह प्राणा: ।।** २) आं ऱ्हीं क्रों अं, यं, रं, लं, वं, शं, षं, सं, हं, ळं, क्षं, अ:,।। क्रों ऱ्हीं आं हंस: सोहं।। **।। अस्यां मूर्तौ जीव इह:स्थित: ।।** ३) आं ऱ्हीं क्रों अं, यं, रं, लं, वं, शं, षं, सं, हं, ळं, क्षं, अ:।। क्रों ऱ्हीं आं हंस: सोहं।। ।। अस्यां मूर्तौ सर्वेद्रियाणी वांगमनस्तकचक्षुक्षोत्रजिव्हाघ्राण पाणि पादपायूपस्थाणि हैवागात्य सुखंचिर तिष्ठंतुस्वाहा।। नंतर गर्भधानादि पंच दश संस्कार सिद्यर्थं पंचदशप्राणवावृत्ती: करिष्ये ।। मूर्तीचे पंधरा संस्कार पूर्ण होण्यासाठी पंधरा वेळा ओंकार म्हणावा व ध्यान करावे. देवाच्या डोळ्यांना तूप लावावे. श्री सिद्धिविनायका नम :।। या मंत्राने देवाला गंध, फूल, अक्षता, वस्त्र, आभूषणे, पत्री इ. पूजा करावी व श्री गणपती अथर्वशीष येत असल्यास म्हणावे व आरती करून पूजा संपन्न करावी.

**- विठ्ठल जोशी-वैरागकर, सोलापूर.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R.N.I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.




## लायन्स क्लबतर्फे ज्येष्ठ कवी देवेंद्र औटी यांना मानपत्र प्रदान

**सुराज्य/सोलापूर** : लायन्स क्लब ऑफ सोलापूर रॉयल तर्फे हतबल माणूस, भाकरी व सामाजिक जळजळीत वास्तववादी, हृदयस्पर्शी कवितांनी जन मनाचा ठाव घेतलेले ज्येष्ठ कविवर्य देवेंद्र औटी यांना मानपत्र प्रदान करण्यात आले. साहित्य, आरोग्य, सामाजिक क्षेत्रात गेली ३२ वर्षे सातत्याने मानवतावादी दृष्टिकोन ठेवून भरीव योगदान देत असलेले, ज्येष्ठ कवी देवेंद्र औटी हे निरपेक्ष आणि निःस्वार्थी भावनेने आपल्या कार्याद्वारे समाजाच्या तळागाळामध्ये आपला माणूस ही जिव्हाळ्याची, आपुलकीची प्रतिमा कार्यातून उभी केलेले मात्र दुर्लक्षित राहिलेले व्यक्तिमत्व असून लायन्समार्फत मानपत्राने आम्ही गौरवीत आहोत, असे उद्गार झोनल चेअरमन शैलेश कोरवार यांनी काढले. आय. एम. ए. हॉल मध्ये संपन्न झालेल्या कार्यक्रमात लायन्स क्लबचे प्रेसिडेंट नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. शिवाजी पाटील, एम. जे. एफ. अरविंद कोणसिरसगी, नरेंद्र गंभीरे, नितीन साळुंखे, ला. डॉ. दौला ठेंगील, झोन चेअरमन शैलेश कोरवार, अजय बचुटे, गुरूभाई जिरोळे, सुरेश किरनाळी यांचे सह समस्त लॉयन सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. आई आपल्या बाळाकडे ज्या वात्सल्याने पाहते त्या दृष्टीने मी समाजाकडे पाहत आलो आहे आणि तेच माझ्या कवितेचे बलस्थान आहे, असे मत सत्काराला उत्तर देताना औटी यांनी काढले.

## माध्यम शब्दकोश निर्मिती समितीवर डॉ. चिंचोळकर यांची निवड

**सुराज्य/सोलापूर** : भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयातर्फे त्रैभाषिक माध्यम शब्दकोश निर्मिती करण्याचे कार्य हाती घेण्यात आले आहे. या कार्यासाठी निवडलेल्या समितीवर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील मास कम्युनिकेशन



विभागाचे प्रमुख डॉ. रवींद्र चिंचोळकर यांची निवड करण्यात आली आहे. यासंदर्भात डॉ. चिंचोलकर यांना भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालय तर्फे पत्र प्राप्त झाले आहे. इंग्रजी, हिंदी व मराठी या तीन भाषांमध्ये माध्यम शब्दकोश तयार करण्याचे कार्य भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने हाती घेतलेले आहे. हे कार्य पूर्णत्वास नेण्यासाठी या समितीची बैठक ५ ते ९ सप्टेंबर २०२२ दरम्यान महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ, वर्धा येथे आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत मान्यवर भाषा तज्ज्ञांचा सहभाग असणार आहे. या निवडीमुळे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कार्याची देशस्तरावर नोंद घेतली जात असल्याचे मत डॉ. रवींद्र चिंचोलकर यांनी व्यक्त केले.

# आरोग्य कर्मचाऱ्यांच्या योगदानामुळे अनेक आजारांचे निर्मूलन : स्वामी

**सुराज्य/सोलापूर**

आरोग्य अधिकारी व कर्मचारी यांच्या अथक प्रयत्नांमुळे जिल्ह्यातील अनेक आजारांचे निर्मूलन झाले असल्याचे मत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी केले.

जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात मंगळवारी लिम्फेटीक फायलेरीया कार्यशाळा पार पडली. यावेळी सीईओ स्वामी बोलत होते. याप्रसंगी जागतिक आरोग्य संघटनेचे राज्य कन्सल्टंट डॉ. राजेंद्रकुमार सिंह, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ शीतलकुमार जाधव, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. अनिरुध्द पिंपळे, निवासी वैद्यकिय अधिकारी डॉ. श्रीकांत कुलकर्णी, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, जिल्हा हत्तीरोग अधिकारी डॉ. अरूण पाथरुटकर, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी रफिक शेख आदी उपस्थित होते. सीईओ स्वामी म्हणाले, देवी, कॉलरा, नारु, पोलिओ सारख्या आजारांचे आज पूर्णपणे निर्मूलन झाले आहे. याकामी आरोग्य अधिकारी व आरोग्य कर्मचारी यांनी प्रचंड मेहनत घेतली आहे. कीटकजन्य आजारांबाबत अद्यापही मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले.




### या मुद्यांवर करण्यात आली चर्चा

कीटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमअंतर्गत हत्तीरोग रुग्णशोध मोहीम, बाह्य लक्षणेयुक्त व अंडवृध्दी रुग्णांची लाईनलिस्ट तयार करणे, हत्तीरोगाबाबत जनजागृती करणे यावर चर्चा करण्यात आली.

## नांदणी टोलनाक्याजवळ छोटा हत्ती उलटल्याने ८ प्रवासी जखमी

**सुराज्य/सोलापूर** : छोटा हत्ती टेम्पोतून गावाकडे जात असताना वाटेत वाहन उलटल्याने ७ महिलांसह ८ जण जखमी झाले. हा अपघात विजापूर मार्गावरील नांदणी टोलनाका येथे आज मंगळवारी सायंकाळच्या सुमारास घडला. अपघातामधील सर्व प्रवासी नांदणी (ता. द. सोलापूर) येथील राहणार असून ते तेरा मैल येथून आपल्या गावाकडे निघाले होते.

भाबाबाई पवार (वय ७०), सुनील नवगिरे (वय ५२), अश्विनी पवार (वय ३५), नागम्मा सूर्यवंशी (वय २१), कविता सुरवसे (वय २२), ललिता वाघासे (वय ६०), कविता विभूते (वय २२) आणि राजश्री सुरवसे (वय ४० सर्व रा. नांदणी ता. दक्षिण सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. ते सर्वजण टेम्पोतून आपल्या गावाकडे निघाले होते. सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास वाटेत दुसऱ्या एका वाहनाने कट मारली. तेंव्हा चालकाचा स्टेअरींग ताबा सुटून वाहन रस्त्याच्या कडेला उलटले. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.


## मतदान ओळखपत्र लिंक करण्यासाठी पुढाकार घ्यावा : आ. कल्याणशेट्टी

**सुराज्य/अक्कलकोट**

अक्कलकोट विधानसभा क्षेत्रातील ज्यांची नावे मतदार यादीत आहेत त्यांनी आपले मतदार ओळखपत्र आपल्या आधार कार्डशी लिंक करावे आणि सध्या सुरु असलेली मोहीम यशस्वी करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घेत अधिक जागृती करावी, असे आवाहन आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी केले आहे.

पुढे बोलताना कल्याणशेट्टी यांनी एक व्हिडिओ जारी करता आपल्या मतदार बंधू भगिनींना आवाहन करून ही मोहीम संपूर्ण यशस्वी होण्यासाठी शहर व ग्रामीण भागात अधिक जनजागृती मोहीम अधिक व्यापक होण्याची अपेक्षा व्यक्त करीत सर्वांनी या मोहिमेत पुढाकार घेण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. ते म्हणाले की आपल्या परिवारातील ज्यांची नावे आज रोजी मतदार यादीत समाविष्ट आहेत अशा सर्व मतदारांचे आधारकार्ड नंबर मतदान कार्डला लिंक करायचे आहे. तरी आपण आपले आणि आपल्या परिवारातील ज्यांची नावे मतदार यादीत आहेत अशा सर्वांचे आधारकार्ड आणि मतदान कार्डचा फोटो आपल्या गावातील मतदार नोंदणी कर्मचारीकडे त्वरित जमा करून किंवा 'व्होटर्स हेल्पलाईन ॲप' च्या मदतीने आपले मतदान कार्ड व आधार कार्ड यांची लिंकिंग करावे.

## गुणवंत शिक्षक पुरस्कारांचे ५ सप्टेंबर रोजी वितरण



प्राचार्य डॉ. मीना गायकवाड | डॉ. राजीवकुमार मेंते | प्राचार्य मनोज बीडकर | डॉ. सौ. प्रिया निघोजकर | प्रा. शावरु जडगे | श्री. तिपण्णा कोळी | श्री. चित्रसेन पाथरुट

### प्राचार्य डॉ. गायकवाड, डॉ. मेंते, प्राचार्य बिडकर, डॉ. निघोजकर, प्रा. जडगे, कोळी, पाथरूट मानकरी

**सुराज्य/सोलापूर**

सोलापूर जिल्हा सामाजिक कार्य समिती, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा, लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर यांच्या वतीने दिले जाणारे गुणवंत शिक्षक पुरस्कार जाहीर झाले असून यावर्षीच्या पुरस्काराचे मानकरी म्हणून प्राचार्य डॉ. मीना गायकवाड (वसुंधरा कला महाविद्यालय), डॉ. राजीवकुमार मेंते (सहाय्यक प्राध्यापक पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ), प्राचार्य मनोज बिडकर (शासकीय आय. टी. आय. मुलांचे) डॉ. प्रिया निघोजकर (सहाय्यक शिक्षिका, सु. रा. मुलींची प्रशाला, सेवासदन), प्रा. शावरू जडगे (सहाय्यक शिक्षक, एस. व्ही. सी. एस. कनिष्ठ महाविद्यालय) तिपण्णा कोळी (मुख्याध्यापक, श्री. साईबाबा प्रशाला कुंभारी गोदूताई परळकर विडी घरकुल), चित्रसेन पाथरूट (मुख्याध्यापक, श्री. नागनाथ मूकबधिर निवासी विद्यालय बाभूळगाव) यांची निवड झालेली आहे. या पुरस्काराचे स्वरूप असून वालचंद कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष कोटी यांच्या हस्ते व लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे यांच्या अध्यक्षतेखाली हा समारंभ सोमवार दि. ५ सप्टेंबर रोजी सकाळी १०. ३० वाजता लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, उपलप मंगल कार्यालयाजवळ, सात रस्ता, सोलापूर येथे होणार आहे, अशी माहिती पुरस्कार निवड समितीचे समन्वयक डॉ. श्रीकांत येळेगावकर, सोलापूर जिल्हा सामाजिक कार्य समितीचे अध्यक्ष उल्हास पाटील व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे अध्यक्ष प्राचार्य के. एम. जमादार यांनी दिली आहे.

## निधन वृत्त

### केदार येरगुंटे



**सुराज्य/अक्कलकोट** : समर्थ नगर येथील युवा शेतकरी केदार सिध्दाराम येरगुंटे (वय३२) यांचे रविवारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, आई, वडिल असा परिवार आहे. भाजपाचे माजी तालुकाध्यक्ष सिध्दाराम येरगुंटे यांचे ते पुत्र होत.

### सावधानतेची जाहिर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे पुळुज, ता. पंढरपूर, जि. सोलापूर येथील लोकांना आमचे अशील श्री. किसन अर्जुन वाघ, रा. पुळूज, ता. पंढरपूर, जि. सोलापूर यांनी सांगीतलेवरुन व दिलेल्या माहिती कागदपत्रावरुन त्यांचेतर्फे जाहीरपणे कळविणेत येते की, मौजे पुळुज, ता. पंढरपूर जि. सोलापूर येथील शेतजमीन गट नं. ६७९/४/ब मधील महादेव विठोबा पांढरे यांचे नावावरील १० आर, आकार ०० रुपये २० पैसे या मिळकतीसंदर्भात आमचे अशिलांनी महादेव विठोबा पांढरे यांच्याबरोबर रीतसर खरेदीचा व्यवहार केलेला होता. त्या दाखल सदर महादेव पांढरे यांनी आमचे अशिलाकडून इसारा दाखल रक्कम देखील साक्षीदारासमक्ष स्वीकारलेली होती व उपविभागीय अधिकारी पंढरपूर साहेब यांचेसमोर आमचे अशिलांना सदर मिळकत विक्री करणेबाबतचे परवानगीचा प्रस्ताव देखील दाखल केलेला होता. असे असताना सदर महादेव विठोबा पांढरे हे आमचे अशिलांचा सदर मिळकतीचा खरेदी घेणेचा हक्क हा जाणूनबुजून डावलणेकरीता सदर मिळकतीचा अन्य त्रयस्त व्यक्तीबरोबर पोकळ स्वरूपाचा व्यवहार करणार आहेत असे खात्रीलायक आमचे अशिलांना समजलेले आहे. त्यामुळे सर्वांना जाहीरपणे कळविणेत येते की, मौजे पुळुज, ता. पंढरपूर जि. सोलापूर येथील शेतजमीन गट नं. ६७९/४/ब मधील महादेव विठोबा पांढरे यांचे नावावरील १० आर, आकार ०० रुपये २० पैसे या मिळकती संबंधी श्री. महादेव विठोबा पांढरे यांच्याशी कोणीही कसल्याही प्रकारचे खरेदी-विक्री, हस्तांतर, तारण, गहाण, करार, बक्षीसपत्र, लिज, लीन अथवा त्रयस्त हक्क प्रस्थापित होईल यासारखे कोणतेही व्यवहार करु नयेत केल्यास आमचे अशिलांचे कायदेशीर हक्कावर व मिळकतीवर मुळीच बंधनकारक राहणार नाही. म्हणून ही सावधानतेची जाहीर नोटीस दिली असे. ता. ३०/०८/२०२२

अशिलातर्फे ॲडव्होकेट
सही/- **ॲड. नानासाहेब तुळजाराम गायकवाड**
बी.एससी., एलएल.बी.
सोमराय नगर, कादे पेट्रोल पंपामागे मोहोळ,
ता. मोहोळ, जि. सोलापूर

### खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः मौजे हिसरे, ता. करमाळा, जि. सोलापूर येथील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि. सोलापूर, सब डि. व ता. करमाळा पैकी मौजे हिसरे येथील शेतजमिन, गट नं. १६१/१ एकूण समाईकातील क्षेत्र पो.ख १.५६.०० हे.आर आकार १ रु ५० पैसे पैकी मधली जमीन क्षेत्र ०.८०.०० आर, आकार ०.७५ रु.पै. ही शेतजमिन ही श्री. संतोष अजिनाथ माने, संगिता अजिनाथ माने, सुलभा अजिनाथ माने सर्व रा. हिसरे ता. करमाळा, जि. सोलापूर यांचे समाईक मालकीची व कब्जे बहिवाटीची आहे. सदर मिळकत आमचे अशील सौ. भाग्यश्री संजय माने, रा. हिसरे, ता. करमाळा, जि. सोलापूर किंवा त्यांनी सांगेल त्या व्यक्तीच्या नावे सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्व परवानगीने विकत घेण्याचे ठरलेले आहे. सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची हमी वर नमूद जमीन मालकांनी आमच्या अशिलास दिली आहे व लवकरच आमचे अशील खरेदीखत लिहून घेणार आहेत. तरी वरील मिळकतीवर कोणाचे कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, लिज, टाच, जप्ती, बोजा, साठेखत, पोटगी, वारसासंबंधी मालकी हक्काबाबत व अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क व अधिकार असल्यास, तसेच कुठल्याही बँकेचे, पतसंस्थेचे कर्जबोजा असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून आठ दिवसांच्या आत कागदोपत्रांनिशी वर नमूद आमचे अशिलाचे दिलेल्या पत्यावर लेखी हरकत घ्यावी. अन्यथा सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे, असे गृहीत धरुन आमचे अशील सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार करतील. तद्नंतर कोणाचीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व ती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली. ता. २६/०८/२०२२

सही/- **ॲड श्री. नितीन शंकरराव भोसले**
मु.पो.ता. माळशिरस, जि. सोलापूर
मो. ९४२३६६२३९६
अशिलातर्फे ॲड.

# उत्कृष्ट मंडळाच्या निवडीसाठी जिल्हास्तरीय समिती

**सुराज्य/सोलापूर**

### उपजिल्हाधिकारी कारंडे अध्यक्ष

राज्यातील उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळांना राज्य शासनाकडून पुरस्कार देण्यात येणार आहेत. या पुरस्कारांची निवड करण्यासाठी कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. यासाठी जिल्हास्तरीय पुरस्काराबाबत जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी समिती स्थापन केली असून समितीच्या अध्यक्षपदी उपजिल्हाधिकारी अनिल कारंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या समितीकडून स्पर्धेमध्ये सहभागी गणेशोत्सवस्थळी प्रत्यक्ष भेट देण्यात येणार आहे. समितीमध्ये उपजिल्हाधिकारी अनिल कारंडे अध्यक्ष असतील. तर इतर शासकीय, शासनमान्य कला महाविद्यालयाचे प्रतिनिधी प्राचार्या प्रतिभा धोत्रे, कला व्यवसाय केंद्र, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी अजित पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. शितलकुमार जाधव, पोलीस अधिकारी राखीव पोलीस निरीक्षक आनंद काजुळकर हे सदस्य म्हणून काम पाहतील. समिती व्हिडिओ व आवश्यक कागदपत्रे गणेशोत्सव मंडळाकडून प्राप्त करून घेईल. प्रत्येक मंडळांना भेटी देऊन तक्त्यानुसार गुणांकन करून एका गणेशोत्सव मंडळाची शिफारस राज्य स्तरावर पाठवतील.

या स्पर्धेत धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी केलेल्या किंवा स्थानिक पोलीस स्टेशन यांची किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांची परवानगी घेतलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सहभागी होता येईल. या निकषांच्या आधारे पुरस्कारासाठी करण्यात येईल. गुणांकनासाठी बाबी पुढीलप्रमाणे - पर्यावरणपूरक मूर्ती-१० गुण, पर्यावरणपूरक सजावट (थर्माकोल/प्लॅस्टिक इ. साहित्य विरहीत)-१५ गुण, ध्वनी प्रदूषण रहित वातावरण-५ गुण, पाणी वाचवा, मुलगी वाचवा, अंधश्रध्दा निर्मूलन, सामाजिक सलोखा इ. समाज प्रबोधन विषयावर देखावा किंवा सजावट-२० गुण, स्वातंत्र्य चळवळी संदर्भातील देखावा किंवा सजावट-२५ गुण, रक्तदान शिबिर, वैद्यकिय सेवा शिबिर इ. कार्य-१० गुण, शाळकरी व महाविद्यालयीन विद्यार्थी किंवा विद्यार्थिनी यांच्या शैक्षणिक, आरोग्य, सामाजिक इ. बाबत केलेले कार्य-१० गुण, महिला, ग्रामीण भागातील वंचित घटक यांच्या शैक्षणिक, आरोग्य, सामाजिक इ. बाबत केलेले कार्य-१० गुण, पारंपरिक सांस्कृतिक कार्यक्रम, स्पर्धा-१० गुण, पारंपरिक, देशी खेळाच्या स्पर्धा-१०गुण, गणेश भक्तांसाठी देत असलेल्या प्राथमिक सुविधा (पाणी, प्रसाधन गृहे, वैद्यकिय प्रथमोपचार, परिसरातील स्वच्छता, वाहतुकीस अडथळा येणार नाही असे नियोजन, आयोजनातील शिस्त इ. (प्रत्येक सुविधेस ५ गुण-२५गुण, असे एकूण-१५० गुण.

## मल्लिकार्जुन नगर येथे रॉडने मारहाण

**सुराज्य/सोलापूर** : एमआयडीसी परिसरातील मल्लिकार्जुन नगर येथे घरासमोर थांबला असता पूर्वीच्या भांडणावरून लोखंडी रॉड आणि दगडाने केलेल्या मारहाणीत मोहसीन अब्बासअली जहागीरदार (वय २७) हा तरुण जखमी झाला. ही घटना सोमवारी रात्रीच्या सुमारास घडली.







ज्येष्ठेभ्यो ज्येष्ठराजाय ज्येष्ठपदप्रदायिने महोदराय पूर्णाय पूर्णानंदाय ते नमः

दैनंदिन कार्यक्रमः
श्रींचे आगमन मिरवणूक -
दि. ३१ ऑगस्टः स. ८.३० वा. मंदिरापासून
श्रींचे दैनंदिन अभिषेक/महापूजाः
दि. १ ते ८ सप्टेंबर स. ७ ते दु. ४
शालेय विद्यार्थ्यांचे अथर्वशीर्ष पठणः
दि. १ सप्टेंबर ते ८ सप्टेंबर- पहाटे ५ ते ६
गणेशयागः
दि. १ ते ५ सप्टेंबर स. ८ ते १२,
दु.१२ ते ४, दु.१ ते ५
वारकरी जागर - समस्त वारकरी बंधु
दि. १ सप्टेंबरः रात्री १० ते पहाटे ३
सत्यविनायक पूजाः
दि. ६ सप्टेंबरः सायं.५ ते ६
श्री स्वानंदेश रथातून श्रींची भव्य विसर्जन मिरवणूक
दि. ९ सप्टेंबर २०२२

www.dagdushethganpati.com वर
'श्रीं'चे २४ तास Live दर्शन
E-mail: contact.dhgt@gmail.com
jayganesh.dhgt@gmail.com


जय गणेश

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, पुणे

सर्व गणेशभक्त बंधू-भगिनींना सस्नेह निमंत्रण - गणेशोत्सव २०२२

'श्रीं'ची प्राणप्रतिष्ठापना आज बुधवार दि. ३१/०८/२०२२ सकाळी ११.३७ वा.

परमपूज्य श्री.महेशगिरीजी बापू, श्री पीठाधीश, श्री गुरु दत्तात्रय संस्थान, गिरनार (जुनागढ) यांच्या शुभहस्ते




परमपूज्य श्री महेशगिरीजी बापू

देखावा व विद्युत रोषणाईचे उद्घाटनः "श्री पंचकेदार मंदिर" सायं. ७ वाजता
मा.ना.चंद्रकांतदादा पाटील, उच्च आणि तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्य मंत्री यांच्या शुभहस्ते

ऋषि पंचमीः दि. १ सप्टेंबर, पहाटे ६ वाजता महिलांचे अथर्वशीर्ष पठण
प्रमुख पाहुणेः मा.अनुराधा पौडवाल, ज्येष्ठ गायिका, डॉ.प्रियंका नारनवरे, पो.उपायुक्त झोन १

भारतीयांचे श्रध्दास्थान आणि महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या या मंगलमूर्तीचा वैभवशाली उत्सव आज बुधवार दि. ३१ ऑगस्ट ते शुक्रवार दि. ९ सप्टेंबर २०२२ पर्यंत कोतवाल चावडी, बुधवार पेठ येथील पारंपारिक जागेत संपन्न होत आहे. अथर्वशीर्ष आवर्तने, महाभिषेक पूजा, गणेशयाग, सत्यविनायक असे पवित्र धार्मिक विधी यावेळी संपन्न होणार आहेत. या सोहळ्यात सर्व भाविकांनी सहभागी होऊन हा पवित्र उत्सव आनंदाने पार पाडावयाचा आहे. आपल्या चरणी विनम्र प्रार्थना की आपण 'श्रीं'च्या या पवित्र उत्सव सोहळ्यात सहभागी होवून दर्शन - प्रसादाचा लाभ घ्यावा ही विनंती.




मा.ना.चंद्रकांतदादा पाटील



मा.अनुराधा पौडवाल

विविध सामाजिक उपक्रम
जय गणेश रुग्णसेवा अभियान ● जय गणेश ज्ञानवर्धन अभियान
जय गणेश कुष्ठरोग पुनर्वसन अभियान ● संगीत महोत्सव
जय गणेश निसर्ग संवर्धन हरित वारी अभियान
स्वयंपूर्ण ग्राम अभियान-दत्तक गाव पिंगोरी
जय गणेश जल संवर्धन अभियान ● औद्योगिक प्रशिक्षण केंद्र
जय गणेश आपत्ती निवारण अभियान ● चातुर्मास प्रवचन
रुग्णवाहिका मोफत सेवा ● सुवर्णयुग सहकारी बँक
पिताश्री वृद्धाश्रम व बाल संगोपन केंद्र, कोंढवा
वीटभट्टी कामगार घरकुल योजना ● वृक्ष गणेशा प्रसाद

श्री पंचकेदार मंदिर



ट्रस्टला मिळणाऱ्या देणग्या आयकर कलम ८०जी अन्वये सवलतीस पात्र

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, पुणे ■ सुवर्णयुग तरुण मंडळ, पुणे
गणपती भवन, २५०, बुधवार पेठ, पुणे २, फोनः २४४७९२२२ ■ गणपती सदन, १३२, बुधवार पेठ, शैक्षणिक संकुल, पुणे २, फोनः २४४९२०००

बाप्पांचे ॲप डाऊनलोड कराः २४ तास बाप्पांचे थेट दर्शन
TATA Sky ACTVE DARSHAN Jio TV दररोज बाप्पांची आरतीः YouTube facebook Instagram

# पंढरपूर तालुक्यात १६ गावांमध्ये १ गाव १ गणपती

## पर्यावरण पूरक सजावटीसाठी पंढरपूर नगरपालिका देणार बक्षीस

सुराज्य/पंढरपूर

पंढरपूर विभागात ३८५ सार्वजनिक गणेश मंडळे आहेत. तर १६ गावांमध्ये १ गाव १ गणपती संकल्पना राबवली जात असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी दिली.

गणेशोत्सव शांततेत पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज झाले असून गणेश मंडळे, मूर्तिकार आदींच्या वेळोवेळी बैठका घेत समाजात अशांतता निर्माण होईल, असे देखावे सादर करू नयेत. तसेच फ्लेक्स, बोर्ड अक्षेपार्ह लावू नयेत. अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत. गणेशोत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी गुन्हेगारी लोकांची यादी बनवण्यात आली आहे.

त्यानुसार त्यांच्यावर तात्पुरती हद्दपारी, स्थानबद्धता करण्यात येत आहे. यामध्ये २७९ जणांना तात्पुरते स्थानबद्ध करण्यात आले आहे. तर तर दोन पेक्षा अधिक गुन्हे असलेले दारू विक्रेते आदी दोनशेहून अधिक जणांना नोटिसा बजावण्यात आलेल्या आहेत. तर १७ जणांना सीआरपीसी ९२ नुसार कारवाई करण्यात आलेली आहे. तर कलम १४४ नुसार १७० जणांवर कारवाई करण्यात आली आहे.

तसेच गणेश मंडळांना डॉल्बीचा आवाज ७५ डिसीबलपेक्षा जास्त सोडू नये अन्यथा त्यांच्यावर कारवाई अटळ आहे. गणेशोत्सव काळात १०० पेक्षा जास्त स्वयंसेवकांची



मदत घेण्यात येत आहे. त्याचबरोबर शहरातील ३ तर ग्रामीण भागातील ५ सार्वजनिक मंडळांना बक्षीस देण्यात येणार असल्याचेही विक्रम कदम यांनी सांगितले.

**नगरपालिका करणार तीन मंडळांचा गौरव**

पर्यावरण पूरक गणेश उत्सव साजरे करणाऱ्या ३ गणेश मंडळांना पंढरपूर नगरपालिकेकडून रोख रक्कम आणि सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात येणार असल्याची माहिती मुख्याधिकारी अरविंद माळी यांनी पत्रकार परिषदेत दिली. पंढरपूर शहरात अद्याप पर्यंत ८९ मंडळांनी परवानगीसाठी अर्ज केले आहेत. त्यातील ८४ मंडळांना परवानगी देण्यात आली आहे.

शहर व तालुक्यातील गावात गणेश उत्सव साजरी करताना समाजहित लक्षात घेणे गरजेचे आहे. मंडळांनी रस्ता खोदला तर त्यांना दंड होईल. असे संकेत प्रांत अधिकारी गजानन गुरव यांनी गणेश उत्सव साजरी करणाऱ्या मंडळांना दिले आहेत.

गणेश उत्सव साजरी करताना कोणत्या सूचनांचे पालन करावयात, व प्रशासनाने केलेल्या तयारीची माहिती सांगण्यासाठी सांगण्यासाठी प्रांत अधिकारी गजानन गुरव यांनी पत्रकार परिषद घेतली होती. यावेळी पंढरपूर उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम, तहसीलदार सुशीलकुमार बेल्हेकर, मुख्याधिकारी अरविंद माळी उपस्थित होते.



## वाढदिवसानिमित्त मनोज कुलकर्णी यांचा सत्कार

सुराज्य/सोलापूर : वाढदिवसानिमित्त मनोज ऊर्फ काकासाहेब कुलकर्णी यांचा मित्र परिवारातर्फे सत्कार करण्यात आला. तसेच विविध मान्यवरांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. गाणगापूर येथील श्री दत्त महाराज मंदिर ट्रस्टच्यावतीने कुलकर्णी यांचा वाढदिवसानिमित्त मुख्य पुजारी प्रसन्न महाराज यांनी सत्कार करून आशीर्वाद दिले.

यावेळी महेशराव हरहरे, अक्षय मस्के, कृष्णा चौगुले आदी उपस्थित होते. याशिवाय काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी खा. शरद बनसोडे, युवक काँग्रेसचे माजी अध्यक्ष सत्यजित तांबे, माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ता अतुल लोंढे, अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ अध्यक्ष मेघराजराजे भोसले, ज्योतिष अतुल शास्त्री, भगरे गुरुजी, ठाणे जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर, राष्ट्रवादीचे नेते दिलीप कोल्हे, महेश निकंबे, विजयप्रताप संघटनेचे दिनेश जाधव, मंत्रालय ब्राह्मण अधिकारी महासंघाचे श्रीकांत कुलकर्णी आदींनी कुलकर्णी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

## जिल्हा बास्केट बॉल संघाची आजपासून निवड चाचणी

सुराज्य/सोलापूर : सांगोला येथे दि. ११ ते १५ सप्टेंबर रोजी होणाऱ्या १८ वर्षाखालील मुले-मुली राज्य अजिंक्यपद बास्केटबॉल स्पर्धेत भाग घेण्यासाठी सोलापूर शहर व जिल्हा बास्केटबॉल संघटनेच्यावतीने संघ निवड चाचणी दि. ३० व ३१ ऑगस्ट रोजी सोलापूर स्पोर्टस् बास्केट बॉल मैदानावर (SSI) अक्कलकोट रोड, सोलापूर येथे घेण्यात येणार आहे.

या स्पर्धेकरिता खेळाडूंचे वय १ जानेवारी २००४ व त्यानंतरचे असावे. खेळाडूंनी वयाच्या दाखल्यासहीत राजेंद्र नारायणकर (९९२३६६२८८०) यांच्याशी संपर्क साधावा.

## सरवदे यांच्या वाढदिवसानिमित्त महाआरोग्य तपासणी शिबिर

सुराज्य/सोलापूर : सोलापूर शहर मध्य विधानसभा व दाराशा नागरी आरोग्य केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सरवदे यांच्या वाढदिवसानिमित्त ४२६ जणांची मोफत तपासणी करून त्यांच्यावर औषध उपचार करण्यात आले.

सोलापूर शहर मध्य विधानसभा अध्यक्ष पंकज ढसाळ व युवराज बुऱ्हाणपुरे मित्र परिवाराच्यावतीने १४ नंबर शिबिर घेण्यात आले. उद्घाटन माजी नगरसेवक अरुण भालेराव, सुशील सरवदे यांच्या हस्ते करण्यात आले. शहर अध्यक्ष अतुल नागटिळक, श्याम मामा धुरी, ॲड. जयप्रकाश भंडारे, शिवाभाऊ उबाळे, विजयसिंह बुऱ्हाणपुरे, शिवराज पोल्लुर, प्रबुद्धकुमार दोड्यानूर तसेच प्रमुख उपस्थिती हणमंत वाघमारे, बापू शिवशरण, महिंद्रा बुऱ्हाणपुरे, पप्पू गायकवाड, प्रभाकर शहापुरे, आकाश राजपूत, राजू भंडारे, राजेश पन्हाळकर, तसेच या शिबिराचे आयोजन करण्यासाठी दाराशा नागरी आरोग्य केंद्राच्या मेडिकल ऑफिसर डॉ. सुहासिनी वाळवेकर व त्यांचा नर्सिंग, आशाताई वर्कर्स संपूर्ण स्टाफ यांचे सहकार्य लाभले.

## भाजीपाल्यांच्या दरात वाढ

कृषी उत्पन्न बाजार समितीकडून मंगळवार, ३० ऑगस्ट



रोजी मिळालेल्या माहितीनुसार भाजीपाल्यांच्या दरात वाढ झाली. यामध्ये कारली, वांगी, गवार, कोथिंबीर, फ्लॉवर, चाकवत, हिरवी मिरची आदींच्या किंमतीमध्ये प्रतिक्विंटल २०० ते हजार रूपये वाढ झाली. तर कोबी, ढोवळी मिरची, अंबाडी भाजी यांचे दर स्थिर राहिले.

### सोलापूर बाजारभाव

| शेतमाल | कमीत कमी दर (क्विं. ) | जास्तीत जास्त दर (क्विं. ) | सर्वसाधारण दर |
|---|---|---|---|
| सफरचंद | ९०० | २,००० | १,२०० |
| कारली | २,००० | ४,००० | ३,००० |
| वांगी | १,२०० | ४,५०० | ३,००० |
| कोबी | ८०० | १,२०० | १,००० |
| ढोवळी मिरची | ५०० | २,५०० | १,५०० |
| गाजर | २,७०० | ३,५०० | ३,००० |
| गवार | ३,५०० | ७,००० | ५,००० |
| कोथिंबीर | ४०० | १,४०० | ८०० |
| काकडी | ५०० | ४,००० | २,५०० |
| फ्लॉवर | ४०० | १,०४० | ८०० |
| लसूण | १,००० | ३,४०० | २,४०० |
| घेवडा | ५,००० | ५,५०० | ५,००० |
| हिरवी मिरची | ३,००० | ४,५०० | ३,५०० |
| अंबाडी भाजी | ५०० | ५०० | ५०० |
| बटाटा | ८०० | २,५५० | २,००० |
| राजगिरा | ६०० | ७०० | ६०० |
| तांदूळ | २,९८० | ६,३०० | ३,६७५ |
| दोडका | १,००० | ३,५०० | २,००० |
| शेपू | ४०० | १,००० | ७०० |
| ज्वारी | २,४०० | २,७०५ | २,४३० |
| सोयाबिन | ५,८८५ | ५,८८५ | ५,८८५ |
| पालक | ५०० | १,००० | ७०० |
| टोमॅटो | १०० | १,२०० | ५०० |
| गहू | २,२९५ | ३,२७५ | २,६९० |

## सोशल अर्बन बँकेला ६७.७९ लाखाचा निव्वळ नफा

सुराज्य/सोलापूर

दि सोलापूर सोशल अर्बन को-ऑप बँकेला यंदा एकूण १०४.३७ लाख ढोबळ नफा झाला असुन निव्वळ नफा ६७ लाख ७९ हजार रुपये इतका झाला आहे.

बँकेत अहवाल वर्षात ४५२२.४९ लाख इतक्या ठेवी असून भागभांडवल २६७.०१ लाख, रिझर्व्ह फंड ५०३.९९ लाख, गुंतवणुक २४९६.७५ लाख व खेळते भांडवल ५६२३.६५ लाख इतके आहे. बँकेने २३०३.५८ लाखाचे कर्जवाटप केले आहे. अथक परिश्रम व सतत आढावा बैठका घेतल्याने यंदा कर्जाची वसुली चांगली झाली असून एनपीएचे प्रमाण कमी करण्यात बँकेला यश आले आहे. सध्या बँकेचे नेट एनपीएचे प्रमाणे २.२४ टक्के इतके आहे. बँकेची एकमेव शाखा मार्केट यार्ड येथे असून ती सक्षमपणे चालवण्यात येत आहे.

थकित कर्जवसुलीत अनेक अडचणी येत आहेत. मुदतीत कर्जाची वसुली न झाल्यामुळे मोठी रक्कम ढोबळ नफ्यातुन तरतूद करावी लागते. तसेच एकूण नफ्यातून ३३ टक्के रक्कम आयकर म्हणून भरावी लागत असल्याने बँकेच्या आर्थिक स्थितीवर त्याचा विपरीत परिणाम होत आहे.

थकीत वसुलीसाठी बँकेने कडक धोरण राबवले आहे.

कर्जदारांनी वेळेवर कर्जाची परतफेड केली पाहिजे. कारण थकीत कर्जाच्या व्याजावर देखील आयकर भरावा लागतो. बँकेच्या थकीत कर्जाला पुरेशी मालमत्ता तारण असून देखील रिझर्व्ह बँकेच्या धोरणामुळे कर्जदाराने तीन महिने व्याज व हप्ता न भरल्यास किंवा कर्ज खात्यावर व्यवहार न केल्यास सदर खाते सुरक्षित असूनही अनुत्पादित ठरते. त्यामुळे कर्जावरील व्याजाची रक्कम उत्पन्न म्हणून घेता येत नाही.

रिझर्व्ह बँक आणि आयकर विभागाचे बदलते धोरण तसेच बँकिंग क्षेत्रातील तीव्र स्पर्धा यामुळे तारेवरची कसरत करावी लागत आहे. सध्या बँकेचे कामकाज पूर्णपणे संगणकीय प्रणालीद्वारे करण्यात येत असून तत्पर ग्राहकसेवा आणि बिनचुक निर्णय घेऊन बँकेचा कारभार करण्यात येत आहे.

थकीत कर्जापोटी मोठी रक्कम ढोबळ नफ्यातून बुडीत कर्ज निधी म्हणून तरतूद करावी लागत असल्याने बँकेस मोठा नफा होऊनही अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. मुदतीत कर्जदारांनी आपल्या कर्जाची परतफेड न केल्याने त्याचा विपरित परिणाम बँकेच्या आर्थिक प्रगतीवर होत आहे. त्यामुळे बँकेच्या संचालक मंडळाने यापुढे थकबाकीदारांविरुध्द कडक कारवाई करण्याचे ठरवले आहे.

बँकेच्यावतीने राबवण्यात येत असलेल्या लखपती ठेव योजनेला ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. महिलांसाठी सोनेतारण कर्जावर १ टक्का सवलत दिली जाते. पगारदारांना २४ तासात कर्ज उपलब्ध करुन दिले जाते. बँकेच्या सभासदांचा, अधिकारी व कर्मचाऱ्यांचा आरोग्य विमा करण्यात येत आहे. संचालक मंडळाने ग्राहकांचा विश्वास संपादन केल्यानेच बँकेची दिवसेंदिवस प्रगती होत आहे.

या पत्रकार परिषदेस बँकेचे संचालक अ. रजाक नाडेवाले, हाजी तौफिक हत्तुरे, म. शफी शेख, डॉ. नाझीया मुलाणी, ॲड. सरफराज पिरजादे, मुबीन बागवान व बँकेचे प्रभारी मॅनेजर इरशाद शेख आदी मान्यवर उपस्थित होते.

## गॅरेजवाल्याच्या मुलीची जिल्हा क्रिकेट संघात झेप

सुराज्य/अकलूज

जिद्द परिश्रम आणि चिकाटीच्या जोरावर अकलूज येथील जावेद कोरबू या गॅरेज वाल्याची मुलगी जोया हिने आपल्या अविरत परिश्रमाने जिल्हा क्रिकेट संघात झेप घेतली असून तिचे सर्वत्र कौतुक होत आहे. तिच्या या जिल्हा क्रिकेट संघातील निवडीने अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



अकलूजमध्ये गणेश नगर येथे चार चाकी वाहनांचे गॅरेज आणि त्यातून मिळणारी कमाई यावरच आपला उदरनिर्वाह चालवत जावेद कोरबू आपला संसार चालवतात.मुलगी जोया खूपच जिद्दी, एक दिवस क्रिकेट क्षेत्रात चमकदार कामगिरी करणारच या ध्येयावर ठाम. आणि अखेर अथक प्रयत्नातून तिचे हे स्वप्न पूर्णत्वास जाताना दिसते आहे. शिवरत्न क्रिकेट अॅकॅडमीच्या माध्यमातून तिची १९ वर्षाखालील मुलींच्या जिल्हा क्रिकेट संघामध्ये निवड झाली आहे.

शिवरत्न शिक्षण संस्थेचे अध्यक्ष धैर्यशील मोहिते पाटील आणि उपाध्यक्षा शीतलदेवी मोहिते पाटील यांनी तिच्या पाटीवर आत्मविश्वासाची शुभेच्छाची थाप टाकली असून शिवरत्न स्पोर्ट्स अॅकॅडमीचे डॉक्टर प्राध्यापक महेश ढेंबरे यांनीही तिला शुभेच्छा दिल्या आहेत. बाळासाहेब रणनवरे व मंजिल नवले यांच्या मार्गदर्शनाखाली तिला क्रिकेटचे धडे मिळाले.



## लिंगायत समाजात ऐक्याचा एल्गार पुकारणे काळाची गरज : आ. कोरे

### डॉ. बसवराज बगले यांची लिंगायत संपर्क मोहीम

सुराज्य/सोलापूर

महाराष्ट्रातील लिंगायत समाजाच्या सर्व घटकांमध्ये ऐक्याचा एल्गार पुकारणे ही काळाची गरज आहे, त्यासाठी राज्यव्यापी दौरा करण्याचा मनोदय वारणानगरचे आमदार डॉ. विनय कोरे सावकार यांनी व्यक्त केला.

लिंगायत समाजातील विविध प्रलंबित प्रश्नांबाबत चर्चा करण्यासाठी महात्मा बसवेश्वर स्मारक कृती समितीचे अध्यक्ष डॉ. बसवराज बगले यांनी रविवारी जनसुराज्य पक्षाचे नेते डॉ. विनय कोरे यांची वारणानगर येथे जाऊन लिंगायत संपर्क मोहिमे अंतर्गत भेट घेतली.

याप्रसंगी उभयतांमध्ये व्यापक आणि उपयुक्त चर्चा झाली. मंगळवेढ्यातील महात्मा बसवेश्वर स्मारकाची उभारणी आणि लिंगायतांसाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ तसेच गाव तेथे स्मशानभूमी यासाठी शासन स्तरावर जलदगतीने कार्यवाही होण्यासाठी सर्व लिंगायत आमदार आणि संघटना प्रमुखांची तात्काळ बैठक घेण्यासाठी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्यासह प्रशासन प्रमुखांची वेळ घेण्याची भूमिका यावेळी डॉ. बसवराज बगले यांनी मांडली.

या चर्चेत महात्मा बसवेश्वर स्मारक कृती समितीचे कार्याध्यक्ष वे. शिवानंद हिरेमठ (मंद्रुप) उपाध्यक्ष सुभाष बसवराज पाटील (संख) सचिव निंगोंडा तळे यांचाही सहभाग होता.

## श्रीसंत सेना महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

सुराज्य/सोलापूर

श्री संत सेना नाभिक बहुउद्देशिय सेवा प्रतिष्ठान आणि महाराष्ट्र नाभिक महामंडळ, सोलापूर शहर, शहर युवक व महिला शाखेच्या संयुक्त विद्यमाने सोलापूर येथील जय भवानी हौसिंग सोसायटी येथे जय भवानी मंदिरात संतश्रेष्ठ श्री. संतसेना महाराजांनी ६५२ व्या पुण्यतिथी निमीत्त अभिवादनाचा सोहळा पार पाडला.

प्रथम हिंदूराव गोरे व डॉ. स्नेहल गोरे यांच्यासह पत्निक सेना महाराज यांचे अभिषेक करण्यात आला.

या सोहळ्यासाठी ह.भ.प. माऊली बचुटे महाराज गळवली वस्ती भजनी मंडळ यांच्यावतीने प्रवचन व कीर्तन ठिक १२.०० वाजता सेना महाराजांचे गुलालाचे सोहळा व महाप्रसाद पार पडला या सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त नायब तहसिलदार नंदकुमार चौधरी व सोलापूर डीसीसी बँकेतील अधिकारी दिनकर माने व सुरेखा माने यांची प्रमुख उपस्थिती लाभली. अध्यक्ष गितेंद्र बेनाळकर हे होते.

या सोहळ्यासाठी श्री. संतसेना प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुशांत क्षिरसागर व मार्गदर्शक संजीवनी गोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे प्रदेश कार्याध्यक्ष सिद्राम रुद्रार, प्रदेश महिला प्रमुख डॉ. माधुरी पारपल्लीवार, प्रदेश संघटक चंद्रमौळी तमनूर, राज्य कार्यकारीणी सदस्य प्रकाश जोगीपेठकर, आदी उपस्थित होते.

## बक्षीहिप्परगे तंटामुक्त समिती अध्यक्षपदी नानासाहेब जाधव

सुराज्य/दक्षिण सोलापूर

दक्षिण सोलापूर तालुक्यातील बक्षीहिप्परगे येथील तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी नानासाहेब जाधव यांची एकमताने फेरनिवड करण्यात आली.



तंटामुक्त समिती अध्यक्ष निवडीसाठी ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीच्या अध्यक्षस्थानी सरपंच सीताराम रामदास राठोड होते. महात्मा गांधी तंटामुक्त समिती अध्यक्ष निवडीचा विषय ग्रामसभेत मांडला असता सर्वानुमते नानासाहेब जाधव यांची बिनविरोध फेरनिवड करण्यात आली. सागर खांडेकर यांनी अध्यक्ष्यांच्या नावाची सूचना मांडली. त्या सूचनेस सर्व गावकऱ्यांनी हात उंचावून आवाजी मतदानाने बिनविरोध निवड केली. जाधव यांचा ग्रामपंचायत सदस्य विश्रांत गायकवाड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सदर ग्रामसभेस ग्रामपंचायत सदस्य प्राचार्य विश्रांत गायकवाड, उपसरपंच मनोज महाडीक, स्मारक समितीचे अध्यक्ष बाबासाहेब माने, स्वप्नील गायकवाड, माजी सरपंच सोनाली जाधव, नागनाथ यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. ग्रामसेविका दिपाली माने यांनी अध्यक्ष निवड जाहीर करून आभार मानले .

## गणेशोत्सव पुरस्कारासाठी प्रस्तावास मुदतवाढ

सुराज्य/सोलापूर

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार सांस्कृतिक कार्य विभागाने यावर्षी गणेशोत्सवासाठी उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळांना शासनाकडून पुरस्कार देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी निवड करण्याची कार्यपद्धत निश्चित केली आहे.

गणेशोत्सव मंडळांना ऑनलाईन अर्ज भरण्याची मुदत ३० ऑगस्ट २०२२ दिली होती, स्पर्धेत जास्तीत जास्त गणेशोत्सव मंडळांना पुरस्कार देण्यासाठी अर्ज भरण्याची मुदत २ सप्टेंबर २०२२ पर्यंत वाढविण्यात आली आहे. याबाबतचे शुद्धीपत्रक शासनाने जाहीर केले आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या गणेशोत्सव मंडळाने सदर अर्ज भरून mahotsav.pldagmail.com या ईमेलवर २ सप्टेंबर २०२२ पूर्वी ऑनलाईन पाठवावेत. प्रकल्प संचालक, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी मुंबई यांनी सदर अर्जाची जिल्हानिहाय विभागणी करून संबंधित जिल्हाधिकारी यांना त्यांच्या ईमेलवर दि. ३ सप्टेंबर २०२२ दुपारी एक वाजेपर्यंत अर्ज उपलब्ध करून द्यावेत. यासाठी प्रत्येक जिल्हाधिकारी यांनी स्वतंत्र ईमेल तयार करून प्रकल्प संचालक, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांना त्यांच्या pldeshpande111gmail.com ईमेल वर कळवावे, असेही शुद्धीपत्रकात म्हटले आहे.

## विवेकानंद प्रतिष्ठानच्या गणेशोत्सव व्याख्यानमालेस शनिवारपासून प्रारंभ

### अक्कलकोट येथे आयोजन, यंदाच्या व्याख्यानमालेचे दहावे वर्ष

सुराज्य/सोलापूर

**येथील विवेकानंद प्रतिष्ठान गणेशोत्सवनिमित्त व्याख्यानमाला शनिवार दि. ३ सप्टेबर ते ८ सप्टेबर दरम्यान सायं. ६ वाजता प्रियदर्शनी मंगल कार्यालय येथे होणार असल्याची माहिती विवेकानंद प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा भाजपचे नूतन जिल्हाध्यक्ष, आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी पत्रकार परिषदेत दिली.**

विवेकानंद प्रतिष्ठानच्या वतीने अक्कलकोट येथे गणेशोत्सव व्याख्यानमालानिमित्त नामवंत व्याख्यात्यांचा बौद्धिक मेजवानी आयोजित करण्यात आली आहे. ही व्याख्यानमाला सहा दिवस चालणार आहे. या व्याख्यानमालेचे पहिले पुष्प ३ सप्टेबर रोजी अहमदनगर चे संजय कळमकर यांचे हसण्यासाठी जन्म आपुला (कथाकथन) या विषयावर गुंफणार आहेत.

४ सप्टेबर रोजी 'महाराष्ट्राची काव्यधारा' मध्ये नारायण पुरीसह तीन कवी कविता सादर करणार आहेत तर ५ सप्टेबर रोजी ख्यातनाम व्याख्याते डीआरडीओचे माजी वरिष्ठ शास्त्रज्ञ काशिनाथ देवधर यांची 'भारताची संरक्षणसिद्धता' या विषयावर तर ६ सप्टेबर रोजी मुंबईचे विसुभाऊ बापट यांचे 'कुटुंब रंगलंय काव्यात' तर ७ सप्टेंबर रोजी नाशिकचे डॉ. नमिता कोहोक यांचे 'सोनेरी मुकुटाचा काटेरी प्रवास' तर ८ सप्टेंबर रोजी चाकण पुण्याचे हभप चैतन्य महाराज वाडेकर यांचे कीर्तनने सांगता होणार आहे.

या व्याख्यानमालेत विविध विषयांवर चतुरस्त्र व्याख्यान होणार आहे. तालुक्यातील रसिकांनी व विशेषतः तरुणांनी या व्याख्यानमालेचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन प्रतिष्ठानचे अध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस मल्लिनाथ कल्याणशेट्टी, अशोक येणेगुरे, मल्लिकार्जुन मसुती, मनोज कल्याणशेट्टी, चंद्रकांत दसले, नागेश कलशेट्टी आदींची प्रमुख उपस्थिती होती.





## 'एक सायकल बहिणीसाठी' उपक्रमाअंतर्गत कुंभारीत सायकल वाटप

**सुराज्य/सोलापूर** : दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुंभारी येथे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांच्या संकल्पनेतून उदयास आलेला एक सायकल बहिणीसाठी या उपक्रमांतर्गत कुंभारी केंद्रात एकूण २३ सायकलींचे वितरण करण्यात आले. केवळ अंतर जास्त असल्याने ज्या विद्यार्थिनी शाळेत उपस्थित राहू शकत नाही त्या विद्यार्थिनींना एक सायकल भेट देवून शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठीचा जिल्हा परिषद सोलापूरच्या या नावीन्यपूर्ण उपक्रमाला कुंभारी गावासह संपूर्ण कुंभारी केंद्रातून मदतीचा हात मिळाला. कुंभारी केंद्रातील २० शाळांच्या प्रत्येकी एक याप्रमाणे २० सायकली व जिल्हा परिषद सदस्य अण्णाप्पा बाराचारे यांच्याकडून एक सायकल व मा. केंद्रप्रमुख राजगुरू यांच्याकडून दोन सायकलांची वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून सन्माननीय शिक्षणाधिकारी (प्राथमिक) किरण लोहार उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून मा. कृषी सभापती मल्लिकार्जुन पाटील, जिल्हा परिषद सदस्य अण्णाप्पा बाराचारे, सरपंचा स्मृती निकंबे, उपसरपंच सुरज पाटील, तसेच कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी मल्हारी बनसोडे, शिक्षण विस्तारअधिकारी जयश्री सुतार यांचे मार्गदर्शन लाभले.

## कंदलगाव तंटामुक्त अध्यक्षपदी निंगफोडे; पोतदार उपाध्यक्षपदी

**सुराज्य/कंदलगाव** : दक्षिण सोलापूर तालुक्यातील कंदलगाव येथील तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी चंद्रकांत निंगफोडे तर उपाध्यक्षपदी गणेश पोतदार आणि विठ्ठल उडाणशिव यांची समितीच्या सल्लागार पदी बिनविरोध निवड करण्यात आली. जनतेचे सरपंच रावसाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामसभा घेण्यात आली. या ग्रामसभेत यांची निवड करण्यात



आली. याप्रसंगी सोसायटीचे माजी चेअरमन आनंदराव कोले, हणमंत कोरे, विठ्ठल साबा, प्रशांत कडते, आण्णाराव वाघमारे, संजय उडाणशिव, धनेश कडते, सुरेश जोकारे, म्हाळप्पा कोरे, मळसिध्द नरुटे, तुळजाराम नरुटे, शिवशंकर स्वन्ने, सोसायटीचे संचालक विजय कुलकर्णी, पोलीस पाटील कैलास कडते ग्रामपंचायत सदस्य सोमनाथ जोकारे, उमेश बन्ने, अशोक कोले, बाळासाहेब वाघमारे, इराण्णा कोष्टी, मळसिध्द कुंभार, श्रीशैल घाटनुरे, कासिम शेख, पंडित बिराजदार, सिध्देश्वर नानाजे, भिमराव जोकारे, शेट्यप्पा बनसोडे, सिद्राम धुळे, तम्मा दुपारगुडे, राहुल उडाणशिव, सद्दाम सय्यद, महिबूब शेख, रहीम शेख, जावेद शेख, लतीफ शेख, सैपन शेख, कैलास उडाणशिव सलमान मकानदार, ग्रामसेविका रेश्मा अढवळकर, ग्रामपंचायत कर्मचारी इलाई शेख, सिद्राम गाडेकर, धनंजय देवकते, महेश डोगे, यल्लाप्पा कुंभार यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री श्री सदगुरु साखर कारखान्याचा बॉयलर अग्नी प्रदीपन सोहळा

**सुराज्य/पिलीव** : राजेवाडी येथील श्री श्री सदगुरु साखर कारखान्याचा २०२२-२३ च्या गळीत हंगामासाठी सदगुरु साखर कारखाना सज्ज झाला असुन त्यासाठी बॉयलर अग्नी प्रदीपन सोहळा संपन्न झाला. यावेळी कारखान्याचे चेअरमन एन शेषागिरीराव, व्हा चेअरमन बाळासाहेब कर्णवर - पाटील, संचालक मोहन बागल यांच्या शुभहस्ते बॉयलर प्रज्वलित करण्यात आला. यावेळी सुनील सावंत यांनी कारखान्याने यंदाच्या गळीत हंगामामध्ये अकरा लाख टन ऊस गाळपाचे उददीष्ट ठेवले असुन यासाठी वाहतुकदार, ऊस उत्पादक सभासद यांनी सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. सदर कार्यक्रमास जनरल मॅनेजर रामाराव, डेप्युटी जनरल मॅनेजर शहाजी पाटील, कोजन मेनेजर बसवराज, चिफ केमिस्ट नागेश पवार, डिसलरी मेननजर लालासो पाटील, शेती अधिकारी अतुल नाईकनवरे, व दत्ता क्षीरसागर, एच आर एडमिन सचीन खटके उपस्थित होते.

## निबंर्गी तंटामुक्त अध्यक्षपदी बिराजदार यांची बिनविरोध निवड

**सुराज्य/दक्षिण सोलापूर** : दक्षिण सोलापूर तालुक्यातील निबंर्गी तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत बिराजदार-पाटील यांची ग्रामसभेत बिनविरोध निवड करण्यात आली श चंद्रकांत बिराजदार-पाटील यांचा या पदासाठी एकमेव अर्ज आल्याने त्यांची एकमताने बिनविरोध निवड घोषित करण्यात आले. ग्रामसभेच्या अध्यक्षपदी उपसरपंच चन्नप्पा बोरगी होते यावेळी दक्षिण सोलापूर तालुक्यातील पत्रकार संघटनेच्या नुतन अध्यक्षपदी निवड झालेल्या अमोगसिध्द व्हनकोरे यांचा ग्रामपंचायतच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शंकरराव पाटील, अरुणकुमार बिराजदार, भारत बिराजदार, गंगाधर बिराजदार, जगदेव ककमारे, विजयकुमार पाटील, येदा दुपारगुडे, रावसाहेब अळगी, ईरेशा कोळी, सिध्दाराम वाघ, निशांत लाडे, अप्पासाहेब बिराजदार-पाटील, बसवराज बिराजदार-पाटील, कल्याणी शिरगोंडे, गुरुनाथ बिराजदार-पाटील, विकास कोळी, शिवशंकर परिट, हुसेनी कांबळे उपस्थित होते सूत्रसंचालन ग्रामसेवक निलेश जोडमोटे यांनी केले. आभार भारत बिराजदार यांनी मानले.

## गुळवंची तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी रवी पवार

**सुराज्य/उत्तर सोलापूर** : उत्तर तालुक्यातील गुळवंची येथील रवी किसन पवार यांची तंटा मुक्त समितीच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी सुहास भोसले, सागर राठोड, दिनेश जगताप, सागर राठोड, विष्णू भोसले, तृप्ती पौळ, नुतन बोराडे ग्रामसेविका मनिषा शिंदे, संतोष कवडे, भारत भोसले, पांडुरंग नवगिरे, बबन पवार, कुमार नवगिरे, दादासाहेब भोसले, मनोहर राठोड, गणेश नवगिरे, किसन पवार, भिमराव बोराडे, पुष्कराज भोसले, महेश नवगिरे, गणेश भोसले, धनाजी भोसले, प्रमोद भोसले, बिभिषण भोसले, मिथुन पवार, सुरज पवार, गणेश शिंदे, दत्ता भाऊ भोसले, नितीन नवगिरे. निखिल झाजले. रामलिंग बोराडे, प्रविण बोराडे, मोहन बोराडे, तानाजी बोराडे, रामहारी भाऊ भोसले, ऋषीकेश भोसले, रत्नाकर भोसले, ग्रामपंचायत कर्मचारी अमोल बोराडे, विश्वजित देशमुख, पोलिस हेडकॉन्स्टेबल पंकज महिंद्रीकर, पोलीस पाटील तानाजी यादव उपस्थित होते.

# डॉ.द्वारकानाथ कोटणीस यांचा भारत-चीन मैत्रीचा वारसा पुढे चालवायला हवा

## चीनचे भारतातील राजदूत वेईडोंग यांचे प्रतिपादन

**सुराज्य/सोलापूर**

डॉ. द्वारकानाथ कोटणीस सैनिकांचे आणि नागरिकांचे जीव वाचवण्यासाठी हजारो मैल दूरवरून चीनमध्ये आले. ते आज आपल्याला सोडून ८० वर्षे झाली असली तरी त्यांचे कार्य सदैव स्मरणात राहील. डॉ. कोटणीस यांचा वारसा पुढे चालवायला हवा आणि चीन-भारत मैत्रीचे नाते पुढे चालू ठेवले पाहिजे, चिनी आणि भारतीय लोकांमधील मैत्री सदैव टिकून राहिले पाहिजे, असे प्रतिपादन चीनचे भारतातील राजदूत सन वेइडोंग यांनी केले.

थोर आंतरराष्ट्रीय मानवतावादी डॉ. द्वारकानाथ कोटणीस यांच्या स्मारकास मंगळवारी चीनचे राजदूत सन वेइडोंग यांनी भेट दिली, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी महापालिका आयुक्त पी. शिवशंकर, उपायुक्त विजय खोराटे, विद्या पोळ, मच्छिंद्र घोलप यांच्यासह महापालिकेचे अधिकारी तथा चीन येथील शिष्टमंडळ उपस्थित होते. सन वेइडोंग म्हणाले, डॉ. द्वारकानाथ कोटणीस यांचे जन्मगाव असलेल्या सोलापूरला भेट देऊन डॉ. कोटणीस मेमोरिअल हॉलला भावपूर्ण श्रद्धांजली वाहणे हा माझ्यासाठी मोठा सन्मान आणि आनंद आहे. ही माझी सोलापूरची पहिलीच भेट आहे, पण मी एका जुन्या मित्रासोबत





पुन्हा भेटलोय असे वाटत आहे. कॅनडाचे डॉक्टर नॉर्मन बेथून आणि भारतीय डॉक्टर कोटणीस जीव वाचवण्यासाठी हजारो मैल दूरवरून चीनमध्ये आले. त्यांच्या हृदयस्पर्शी कथा आणि उदात्त व्यक्तिरेखा चिनी लोकांच्या हृदयात सदैव स्मरणात राहतील. कोटणीस आपल्या कामाला पूर्णपणे समर्पित होता. अत्यंत त्रास आणि औषधांचा प्रचंड तुटवडा अशा परिस्थितीत आणि रणांगणातून आग आणि गोळ्यांचा सामना करत त्यांनी चार वर्षात ९०० हून अधिक शस्त्रक्रिया पूर्ण केल्या. उत्कृष्ट वैद्यकीय कौशल्याने, त्यांनी केवळ स्वतः च्या हातांनी मोठ्या संख्येने जीव वाचवले नाहीत, तर त्यांनी बेथून इंटरनॅशनल पीस हॉस्पिटलचे पहिले संचालक म्हणून काम केले आणि चीनसाठी कुशल वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या मोठ्या गटाला प्रशिक्षण दिले. त्यामुळे त्यांची गणना महान आंतरराष्ट्रीय योद्धयामध्ये होते. कोटणीस यांच्या स्मृती सभागृहातील संग्रह आणि डॉ. कोटणीस यांच्या अवशेषांची काळजीपूर्वक देखभाल केल्याबद्दल आपण महापालिका आणि कोटणीस स्मृती सभागृहाचे आभारी आहोत. गेल्या काही वर्षांपासून दोन्ही देशातील लोकांनी चीन-भारत मैत्रीच्या कारणासाठी महत्त्वाचे योगदान दिले आहे. डॉ. कोटणीस यांच्या बलिदानानंतर, चिनी आणि भारतीय लोक कायमच मैत्रीसाठी वचनबद्ध आहेत. आम्ही भारतासोबत राजकिय परस्पर विश्वास वाढवण्यासाठी, परस्पर फायदेशीर सहकार्य वाढवण्यासाठी, मतभेद योग्यरीत्या हाताळण्यासाठी आणि चीन-भारत संबंधांना योग्य मार्गावर आणण्यासाठी काम करण्यास तयार आहोत. यावेळी जिकिंग, बाओ., इ्युजियाओ, मियाओ, झियाओबिंग, ली,चेन, योंगशेंग, झोउ, युहुआ, वँड, शिउहुआ, यांग, शुआंड, झांग, निंग, एक्सयू, झिवेल, पॅन, मिंग्लियांग, झोउ, झियानहुआ, काँग, अधिकारी उपस्थित होते.

## सातबाऱ्यावरील नाव कमी करण्यासाठी लाच घेताना तलाठी चतुर्भुज

**अक्कलकोट** : शेतीच्या सातबारावर एकाचे नाव कमी करून खरेदीदार यांचे नाव लावण्यासाठी दहा हजाराची लाच घेणाऱ्या तलाठ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले.



गणेश हणमंतराव कदम (वय ४८, पद तलाठी, मूळ नेमणूक सज्जा गळोरगी, अति, कार्यभार सज्जा- मिरजगी तहसील कार्यालय, अक्कलकोट) असे अटक करण्यात आलेल्या तलाठ्याचे नाव आहे. यातील तक्रारदाराने त्याच्या आईच्या नावे असलेली शेत जमीन विक्री केली आहे.

शेतीच्या सातबारा उताऱ्यावरून तक्रारदारांच्या आईचे नांव कमी करुन खरेदीदार यांचे नांव लावून उतारा देण्याकरिता गणेश हनुमंतराव कदम यांनी तक्रारदाराकडे १० हजार लाचेची मागणी केली. ही लाच घेताना त्यास रंगेहाथ पकडण्यात आले. ही कारवाई अप्पर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे सूरज गुरव, पोलीस उपअधीक्षक संजीव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उमाकांत महाडिक, पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार - पोह शिरीषकुमार सोनवणे, पोना घाडगे, सन्नके, उडानशिव यांनी पार पाडली.

# आ. शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर

**सुराज्य/टेंभुर्णी**

विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक चेअरमन आ. बबनराव शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त १ सप्टेंबर रोजी गावोगावी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती कारखान्याचे व्हाईस चेअरमन वामनराव उबाळे यांनी दिली.



विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक चेअरमन आमदार बबनराव शिंदे यांचा १ सप्टेंबर रोजी वाढदिवस असून त्यांच्या वाढदिवसानिमित्त प्रतिवर्षी प्रमाणे युनिट नं. १ पिंपळनेर व युनिट नं. २ करकंब चे कारखाना कार्यस्थळावर सामाजिक उपक्रम म्हणून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच मोठ्या प्रमाणावर रक्त संकलन करण्याचा सामाजिक हेतूने आर्या पब्लिक स्कूल, माढा, थोरात मंगल कार्यालय, टेंभुर्णी, महादेव मंदिर, बेंबळे, संकेत मंगल कार्यालय, कुर्डूवाडी, श्रीपूर, रांझणी-भिमानगर, मोडनिंब या व इतर ठिकाणी कारखान्यामार्फत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या रक्तदान शिबिरामध्ये रक्त संकलनासाठी डॉ. हेडगेवार रक्तपेढी, सिध्देश्वर रक्तपेढी, सोलापूर, सरजुबाई बजाज रक्तपेढी, पंढरपूर, सिव्हिल हॉस्पिटल, सोलापूर, श्री रामभाई शहा रक्तपेढी, बार्शी, स. म. शंकरराव मोहिते- पाटील रक्तपेढी, अकलूज, आश्विनी रक्तपेढी, सोलापूर, मल्लिकार्जुन रक्तपेढी, सोलापूर, मुक्ताई रक्तपेढी, इंदापूर कुर्डूवाडी ब्लड स्टोअरेज, महात्मा बसवेश्वर रक्तपेढी, सोलापूर, अतहर ब्लड, सोलापूर, अक्षय रक्तपेढी, सोलापूर कमलाभवानी रक्तपेढी यासह इतर रक्तपेढ्या रक्त संकलनासाठी आमंत्रित करण्यात आल्या आहेत. या माध्यमातून दोन हजार पिशव्या रक्त संकलन करण्याचा मानस आहे अशी माहिती व्हाईस चेअरमन वामनराव उबाळे यांनी दिली. तरी कामगार, कार्यकर्ते, हितचिंतक व सहकारी यांनी १ सप्टेंबर रोजी कारखान्यामार्फत गावोगावी आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरामध्ये मोठ्या संख्येने सहभागी होऊन रक्तदान करावे असे आवाहन व्हाईस चेअरमन वामनराव उबाळे, कार्यकारी संचालक एस. एन. डिग्रजे व युनिट नं. २ चे जनरल मॅनेजेर एस. आर. यादव यांनी केले.

## अकलूज येथे महर्षी करंडक वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

**सुराज्य/अकलूज** : अकलूज येथील शिक्षण प्रसारक मंडळ संचालित शंकरराव मोहिते महाविद्यालयाच्यावतीने घेण्यात येणाऱ्या महर्षी करंडक शालेय व खुल्या राष्ट्रीय ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धे चे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील यांनी दिली.



मोहिते पाटील पुढे म्हणाले की, वक्तृत्व कलेच्या आकाशात विहार करणाऱ्या कला विहंग पंखाच्या समृद्धीसाठी, अभिव्यक्तिच्या माध्यमातून मनामनाच्या भिंती पाडून एक मानवतावादी स्नेहबंध निर्माण करण्याच्या उद्देशाने रविवार दि. ११ सप्टेंबर रोजी या राष्ट्रीय वक्तृत्व स्पर्धे चे आयोजन करण्यात आले आहे.

स्पर्धेचे हे ७ वे वर्ष आहे. ही स्पर्धा मराठी भाषेमध्ये असून खुल्या गटासाठी काय झाडी काय डोंगार काय हाटील. समद ओक्केच, भारतीय स्वातंत्र्याची ७५ वर्ष, छत्रपती शिवाजी महाराज दुर्ग व्यवस्थापन, एक तरी ओवी अनुभवावी, वेळीच सावरायला हवं अस्ताव्यस्त पडलेले आवरायला हवं तर शालेय गटासाठी सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांचे चरित्रातून आम्ही काय शिकावे, अकलूजमध्ये संपन्न झालेला स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवी सोहळा, छत्रपती शिवाजी महाराज, माझा आवडता वैज्ञानिक, मला आवडलेले पुस्तक असे विषय देण्यात आले आहेत. स्पर्धेच्या सादरीकरणासाठी ५ मिनिटे व जास्तीत जास्त ५.३० मिनिटांचा कालावधी देण्यात आला आहे. सदर स्पर्धेच्या शालेय गटासाठी रू. ७५ तर खुल्या गटासाठी रू. १५० प्रवेश फी ठेवण्यात आली आहे. शालेय गटासाठी प्रथम क्रमांक रू. २,५००, द्वितीय क्रमांक रू. २,०००, तृतीय क्रमांक रू. १,५०० तर खुल्या गटासाठी प्रथम क्रमांक रू. ५,०००, द्वितीय क्रमांकासाठी रू. ४,०००, तृतीय क्रमांकासाठी रू. ३,००० व प्रमाणपत्र अशी पारितोषिकेही देण्यात येणार आहेत.

# शिवामृतचा मोदक पेढा ठरणार आकर्षण

**सुराज्य/अकलूज**

श्री गणपती आणि मोदक यांच्या विविध आख्यायिका ऐकावयास मिळतात गणेशोत्सव काळात मोदकाचा नैवेद्य पवित्र मानला जातो त्यामुळे मोदकाला प्रचंड मागणी असते भाविकांच्या या भावनेला साद देत शिवामृत दूध उत्पादक संघाने मोदक पेढा बाजारात मोठ्या प्रमाणात उपलब्ध केला असून हा मोदक पेढा यंदाच्या गणेशोत्सव काळात आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणार आहे.




अकलूज विजयनगर येथील शिवामृत दूध उत्पादक संघाचा संपूर्ण महाराष्ट्रभर नावलौकिक आहे. विविध उत्पादनांच्या माध्यमातून दूध संघाने महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील लोकांच्या मनात घर केले आहे. ग्राहकांची गरज ओळखून त्यांच्या पसंतीस शिवामृत दूध संघ नेहमीच उतरला आहे. कोरोना काळानंतर म्हणजेच दोन वर्षानंतर यंदा गणेशोत्सव मोठ्या थाटामाटात उत्साहात साजरा केला जाणार आहे. भाविकांच्या उत्साहाला उधाण आलेली दिसत आहे.

गणपती काळात मोदकाला भरपूर मागणी असते हीच भाविकांची गरज ओळखून शिवामृत दूध उत्पादक संघाने आकर्षकरीत्या मोदक पेढा तयार केला असून बाजारामध्ये तो सर्वत्र उपलब्ध असणार आहे. त्यामुळे यंदाच्या गणेशोत्सव काळात शिवामृतचा मोदक पेढा आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणार आहे.

## विजेचा शॉक लागल्याने युवकाचा मृत्यू

**सुराज्य/उत्तर सोलापूर** : उत्तर तालुक्यातील पडसाळी येथील परिमल श्रीरंग भोसले



वय- ३६ यांचे संध्याकाळी विजेचा शॉक लागल्याने निधन झाले.

विद्युत पंप चालू करताना विजेचा शॉक लागला. बराच वेळ झाला अजून कसे आले नाहीत म्हणून कुटुंब पाहण्यासाठी गेले असता बेशुध्दावस्थेत पडल्याचे दिसून आले. ताबडतोब वडाळा येथील ग्रामीण रुग्णलायात उपचार करून उपचारासाठी न्हेण्यात आले असता मृत्यू झाल्याचे स्थानिक डॉक्टरांनी सांगितले. त्यांच्या पश्चात पश्चात आई-वडील, पत्नी, दोन मुले, भाऊ -भावजय असा परिवार आहे.

## अन्नछत्र मंडळात आज श्री गणेशाची प्रतिष्ठापना

**सुराज्य/अक्कलकोट**

श्री गणेशोत्सवानिमित्त श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे श्री शमी विघ्नेश गणेश मंदिरात श्री गणेशाच्या प्रतिष्ठापना न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली, न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते बुधवार रोजी श्री गणेश चतुर्थीच्या दिवशी सकाळी ९ वा. होणार असल्याचे माहिती न्यासाचे सचिव शामराव मोरे यांनी दिली.

श्रीक्षेत्र अक्कलकोटात अन्नछत्र मंडळ या धर्मादाय न्यासाच्या आवारात सन १९९० साली जमिनीची झाडी झुडपे काढून साफसफाई व सपाटीकरण करीत असताना जमिनीच्या मध्यवर्ती भागात शमीवृक्ष आढळला. तेथे सपाटीकरण करते वेळेस श्री गणेशाची सुंदर मूर्ती आढळली. त्याच शमीवृक्षाखाली ३२ वर्षा पूर्वी श्री गणेशाची स्थापना करून सुंदर असे मंदिर व सभामंडप बांधण्यात आले आहे.

श्री स्वामी समर्थांच्या पावन भूमीवर श्री शमीविघ्नेश गणेश असल्याने त्याचे स्थान व महात्म्य अलौकिक आहे. या मंदिरात नित्य पूजा अर्चा, अभिषेक, अथर्वशीर्ष अभिषेक (२१ व १०० आवर्तने), सहस्त्र दुर्वार्चन, गणेश याग अशी सेवा करावयाचे असल्यास न्यासाच्या देणगी कक्षात पावती करता येते. संकष्टी व अंगारकी चतुर्तीला रात्री ८.३० वा. आरती करण्यात येते.

# ताराराणी महिला कुस्ती केंद्राची राष्ट्रीय पदकाला गवसणी

## पै. शेंडे हिने मिळविले पहिले कांस्य पदक

**सुराज्य/अकलूज**

भारतीय कुस्ती महासंघ आयोजित रोहतक (हरियाणा) येथे संपन्न झालेल्या १५ वर्षाखालील राष्ट्रीय स्पर्धेत फ्री स्टाईल ३६ किलो वजन गटामध्ये अकलूजच्या ताराराणी महिला कुस्ती केंद्राच्या पै. वेदिका शेंडे हिने पहिले कांस्य पदक मिळवीत ताराराणी महिला कुस्ती केंद्राच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला.



सहकार महर्षी कै. शंकरराव मोहिते पाटील, राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, जयसिंह मोहिते पाटील व मदनसिंह मोहिते पाटील यांनी सहकाराच्या माध्यमातून कुस्ती जोपासली वाढवली. आज देखील मोहिते-पाटील परिवार कुस्ती खेळाला राजश्रय देत आहे.


आधुनिक काळात कुस्तीचे स्वरूप देखील बदलले, आखाड्याची कुस्ती मॅटवर खेळली जाऊ लागली. महिला मल्ल देखील पुरुषांच्या बरोबरीने कुस्तीचा आखाडा गाजवू लागल्या. मात्र महाराष्ट्रातील महिलांची कुस्ती म्हटलं की बहुतांश ग्रामीण भागात विरोध दर्शवला जातो तर शहरात या खेळाला आता पसंती दर्शवली जाते. ही विषमतेची सामाजिक परिस्थिती बदलण्यासाठी धैर्यशील मोहिते पाटील व ताराराणी महिला कुस्ती केंद्राच्या अध्यक्षा शितलदेवी मोहिते पाटील यांनी महिला कुस्ती प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याचा धाडसी निर्णय घेतला.

धैर्यशील मोहिते पाटील म्हणाले, ग्रामीण महाराष्ट्रात महिलांची कुस्ती रुजवण्यासाठी व महिला मल्लांच्या प्रतिभेला चालना देण्यासाठी अकलूज येथे महिलांसाठी २०१७ साली अद्ययावत असे ताराराणी महिला कुस्ती केंद्र उभारण्यात आले.

राज्यभरात कुस्ती आखाड्यांचे स्वरूप आजही पारंपरिक लाल मातीचेच आहे. राष्ट्रीय, कॉमनवेलथ ऑलिंपिक पदक विजेते कुस्तीपटू घडवण्यासाठी मॅटवर खेळणे ही काळाची गरज बनली आहे. परंतु ग्रामीण भागात बऱ्याच ठिकाणी मॅटची व गुणवत्तापूर्ण प्रशिक्षणाची तसेच राष्ट्रीय प्रशिक्षकांची सुविधा उपलब्ध नसल्याचा फटका कुस्तीमध्ये कारकीर्द घडवू इच्छिणाऱ्या खेळाडूंना बसतो म्हणूनच राष्ट्रीय स्तरावर मॅटवरील कुस्ती खेळाडू घडवण्यासाठी त्यासाठी बेसिक सुविधा पुरवण्यात पासून ते राष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देत आहोत यांचा जास्तीत जास्त होतकरू खेळाडूंनी लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले.

शितलदेवी मोहिते-पाटील म्हणाल्या, २०१८ साली ताराराणी महिला कुस्ती केंद्राची स्थापना झाली. या कुस्ती केंद्रातील महिला मल्लांनी तालुका, जिल्हा अगदी राज्यपातळीवरील पदके मिळवली चार वर्षांनी ताराराणीस पहिले राष्ट्रीय पदक मिळाले. आम्ही जिद्दीने सुरू केलेल्या ताराराणी महिला कुस्ती केंद्राला पहिले राष्ट्रीय पदक मिळाल्याबद्दल एक मनस्वी अभिमान वाटतोय असे त्या म्हणाल्या.

# इराकमध्ये अराजकता



## ▸ राष्ट्रपती भवनात घुसले हजारो लोक, ▸ गोळीबारात २० जणांचा मृत्यू

✔ सुराज्य/बगदाद

**इराकची राजधानी बगदादमध्येही भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. इराकमध्ये अराजकता माजली आहे. संतप्त आंदोलकांनी श्रीलंकन नागरिकांप्रमाणेच इराकच्या राष्ट्रपती भवन आणि सरकारी भवनांत घुसखोरी केली आहे. त्यांना रोखण्यास सुरक्षारक्षकानांही अपयश आले आहे.**

श्रीलंकेनंतर आता इराकमध्येही अराजकता माजली आहे. देशात गेल्या १० महिन्यांपासून सरकार अस्तित्वात नाहीये. तसेच शक्तिशाली शिया धर्मगुरू मुक्तदा अल-सदर यांनीही राजकारणातून सन्यास घेण्याची घोषणा केली आहे. त्यामुळं त्यांचे समर्थक संतप्त झाले आहे.

नागरिकांनी राष्ट्रपती भवनात मोठ्या संख्येने प्रवेश केला आहे. त्यांच्यात आणि ईराण समर्थक इराकियांमध्ये संघर्ष निर्माण झाला होता. गोळीबाराच्या घटनेत २० जणांचा मृत्यू झाल्याचं समोर येतंय.

इराकची राजधानी बगदादमध्येही अराजकतेची स्थिती निर्माण झाली आहे. संतप्त जमावाने श्रीलंकेप्रमाणेच राष्ट्रपती भवन आणि सरकारी भवनावर ताबा मिळवला आहे.

जमावातील काही जण राष्ट्रपती भवनातील स्विमिंग पूलमध्ये उतरले आहेत. हे लोकं मुक्तदा अल-सदरचे समर्थक असल्याचे बोलले जात आहे. सोमवारी मुक्तदा अल सदर यांनी राजकारणातून सन्यास घेण्याची जाहीर करताच त्यांच्या समर्थकांनी एकच गोंधळ घालण्यास सुरुवात केली.

बगदादच्या रस्त्यांवर दगडफेकीच्या घटनाही घडल्या. काही ठिकाणी गोळीबाराच्या घटनाही घडल्याचे सांगण्यात येतेय. या घटनेत २० जणांचा मृत्यू झाल्याचं समोर आले आहे.

### नव्या सरकारचा विरोध

इराकमध्ये नव्या सरकारला गेल्या एक वर्षांपासून विरोध सुरु आहे. शिया धर्मगुरूचे समर्थक इराकमध्ये गेल्या कित्येक वर्षांपासून भ्रष्टाचाराविरोधात लढा देत आहेत.

## दिल्ली सरकारवर अण्णा हजारेंची बोचरी टीका

✔ सुराज्य/सोलापूर



**मद्य धोरणात कथित घोटाळा झाल्याचे आरोप दिल्ली सरकारवर करण्यात आले आहेत. याप्रकरणी आम आदमी पार्टीच्या अडचणी वाढत चालल्या आहेत. असे असताना आता ज्येष्ठ समाजसुधारक अण्णा हजारे यांनी एक पत्र लिहून दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यावर टीकास्त्र सोडले आहे.**

केजरीवाल यांना उद्देशून लिहिलेल्या पत्रात अण्णा हजारे म्हणाले की, 'तुम्ही स्वराज' पुस्तकात मोठमोठ्या गोष्टी लिहिल्या होत्या, पण त्याचा तुमच्या आचरणावर काहीही परिणाम झाल्याचे दिसत नाही. तुम्ही सध्या सत्तेच्या नशेत धुंद आहात, जनआंदोलनातून उदयास आलेल्या पक्षाला अशा प्रकारचे वागणे शोभत नाही, अशी टीका अण्णा हजारेंनी केली आहे.'

अण्णा हजारेंनी पत्रात लिहिलं की, 'तुमच्याकडून आम्हाला खूप आशा होत्या. पण राजकारणात गेल्यानंतर आणि मुख्यमंत्री झाल्यानंतर तुम्ही आदर्श विचारसरणीला विसरला आहात. जशी दारूची नशा असते, तशीच सत्तेची नशा असते. तुम्ही सत्तेच्या नशेत बुडून गेला आहात, असे दिसतेय.

दिल्ली सरकारकडूनही अशा प्रकारचे धोरण अपेक्षित नव्हते. पण आम आदमी पार्टीच्या दिल्ली सरकारने नवीन मद्य धोरण आणले आहे. इतर राजकीय पक्षांप्रमाणेच तुम्हीही पैशांसाठी सत्ता आणि सत्तेसाठी पैसा या दुष्टचक्रात अडकल्याचे दिसत आहे.

एका मोठ्या आंदोलनातून उदयाला आलेल्या राजकीय पक्षाला हे शोभत नाही, अशी टीका अण्णा हजारेंनी पत्राद्वारे केली आहे.'

## वानराने महिलेला विहिरीत ढकलले

✔ सुराज्य/नांदेड : जिल्ह्यातील किनवट तालुक्यातील नंदगाव येथे विहिरीवर पाणी भरण्यासाठी गेलेल्या एका महिलेला वनराने विहिरीत ढकलून दिल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

विहिरी शेजारी असलेल्या नागरिकांनी सतर्कता बाळगत या महिलेला विहिरीच्या बाहेर काढले. अन्यथा दुर्दैवी घटना घडू शकली असती. या घटनेत पल्लवी पंडित तांबारे ही महिला किरकोळ जखमी झाली असून भयभीत झालेल्या महिलेला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आहे.

## काँग्रेस अध्यक्षपदाच्या शर्यतीत शशी थरूर

✔ सुराज्य/नवी दिल्ली



काँग्रेसमध्ये अध्यक्षपदासाठी निवडणूक येत्या १७ ऑक्टोबरला होणार आहे. या निवडणुकीसाठी अनेक नेत्यांची नावे चर्चेत आहे. काँग्रेसचे वरिष्ठ नेते आणि तिरुअनंतपूरमचे खासदार शशी थरूर हे देखील काँग्रेस अध्यक्षपदासाठी निवडणूक लढवण्याची शक्यता आहे. त्याबाबत शशी थरूर गांभीर्याने विचार करत असल्याची माहिती आहे. मात्र अद्याप त्यांनी आपला अंतिम निर्णय जाहीर केलेला नाही.

काँग्रेसच्या अध्यक्षपदाची निवडणूक लढवणार की नाही याबाबत सध्या भाष्य करण्यास शशी थरुर यांनी नकार दिला आहे. यापूर्वी त्यांनी मल्याळम 'दैनिक मातृभूमी'मध्ये काँग्रेसच्या अध्यक्षपदाची निवडणूकीवर एक लेख लिहिला आहे. ज्यामध्ये त्यांनी मुक्त आणि निष्पक्ष निवडणुकांचे आवाहन केले आहे. तसेच पक्षाने काँग्रेस कार्यकारिणीच्या डझनभर जागांसाठीही निवडणुका जाहीर केल्या पाहिजेत. काँग्रेससाठी अध्यक्षपदाच्या निवडणुकीतल शशी थरूर यांच्यासह मनीष तिवारी आणि पृथ्वीराज चव्हाण यांचीही नावं चर्चेत आहेत. थरूर यांनी लेखात लिहिले आहे, पक्षाने काँग्रेस कमिटीच्या सदस्यपदासाठी निवडणुकीची घोषणा करायला हवी होती. पक्षाच्या या प्रमुख पदांचे नेतृत्व कोण करणार हे निवडण्याची एआयसीसी आणि पीसीसी सदस्यांना परवानगी दिली पाहिजे. पक्षात संघनात्मक बदल करण्याची मागणी करणाऱ्या काँग्रेसच्या जी-२३ नेत्यांमध्ये शशी थरुर यांचाही समावेश आहे.

## आसारामबापूंच्या सुटकेसाठी पुण्यात भक्तांचा मोर्चा




✔ सुराज्य/पुणे

**स्वयंघोषित धर्मगुरू असुमल हरपलानी उर्फ आसाराम बापू हा बलात्कारप्रकरणी आमरण जन्मठेपेची शिक्षा भोगत आहेत. त्यांच्या अटकेला ३० ऑगस्टला ९ वर्षे पूर्ण झाले आहेत.**

या कालावधीत जामीन, पॅरोल न मिळाल्याने तो मिळावा, फास्ट ट्रॅक कोर्टमधून तातडीने न्याय मिळावा या मागणीसाठी श्री योग वेदांत सेवा समिती (पुणे) साधक मंडळीतर्फे पुण्यात मंगळवारी मूक मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. पुणे आणि लगतच्या जिल्हयातून आलेले सुमारे ५ हजार आसाराम भक्त या मूक मोर्चात सहभागी झाले होते. काळया फिती बांधून शनिवारवाडा ते जिल्हाधिकारी कार्यालय मार्गावर सकाळी साडेअकरा वाजता मूक मोर्चाला प्रारंभ झाला. साधकांमध्ये महिलांचे प्रमाण लक्षणीय होते. सर्वांनी सफेद कपडे परिधान करून दंडाला काळया फिती लावल्या होत्या आणि हातात भगवे ध्वज घेतले होते. 'बापूजी को रिहा करो', 'संत न होते तो जल मरता संसार', 'नहीं सहेंगे अत्याचार, झूठे आरोपोंका हो बहिष्कार' अशा अनेक प्रकारच्या घोषणांचे फलक साधकांनी हाती घेतले होते. न्यायालयीन प्रक्रिया संथ गतीने चालत असून न्याय मिळण्यात विलंब होत आहे. याची शासन, समाज आणि न्यायालयाने दखल घ्यावी, असे समितीच्या निवेदनात म्हटले आहे. शनीवारवाडा, लाल महाल, फडके हौद, दारूवाला पूल, १५ ऑगस्ट चौक मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत पायी चालून राष्ट्रपतींसाठीचे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयात देण्यात आले.

## बाबरी-गुजरात दंगल खटले बंद करणार

✔ सुराज्य/नवी दिल्ली

**२००२ बाबरी मशीद विध्वंस आणि गुजरात दंगलीशी संबंधित सर्वोच्च न्यायालयाने मोठा निर्णय घेतला आहे. न्यायालयाने बाबरी मशीद विध्वंस प्रकरणी उत्तर प्रदेश सरकारविरोधात दाखल झालेल्या आणि गुजरात दंगलीशी संबंधित दाखल झालेल्या ११ जनहित याचिका बरखास्त केल्या आहेत.**

२०१९ मध्ये श्री राम जन्मभूमी बाबरी मस्जिदप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने अंतिम निकाल दिल्यानंतर उत्तर प्रदेश सरकारविरोधातील या प्रकरणीच्या जनहित याचिका निष्फळ ठरल्या असून त्या बंद करण्यात येत असल्याचे सांगितले. गुजरातमधील गोध्रा येथील दंगलींनंतर न्यायालयीन हस्तक्षेपाची मागणी करत अनेक जनहित याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. परंतु नंतर या प्रकरणी झालेल्या प्रगतीनंतर याचिका निष्फळ ठरत असल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहे.

सरन्यायाधीश उदय लळित यांच्या अध्यक्षतेखालील त्रिसदस्यीय खंडपीठाने नमूद केले आहे की, यातली मुख्य याचिका सीबीआयकडे तपास सोपवावा अशी होती जी हायकोर्टाने फेटाळली होती. खंडपीठाने हे स्पष्ट केले की नऊ महत्त्वाच्या याचिकांसदर्भात कोर्टाने विशेष तपास पथकाची स्थापना केली होती.

तपास पथकाच्यावतीने ज्येष्ठ वकिल मुकुल रोहतगी यांनी बाजू मांडली की, नऊपैकी आठ याचिकांची सुनावणी ट्रायल कोर्टात पूर्ण झाली आहे. केवळ नरोडा गाव प्रकरणाची सुनावणी बाकी असून तीही अंतिम टप्प्यात आहे. कार्यकर्त्या तिस्ता सेटलवाड यांच्यावर २००२ च्या दंगलीमध्ये निष्पापांना अडकवण्यासाठी खोटा पुरावा तयार केल्याचा आरोप आहे. सेटलवाड यांनी जामीन मिळावा यासाठी केलेल्या अर्जावर सर्वोच्च न्यायालय सुनावणी घेणार आहे.



बाबरी मशीद विध्वंस प्रकरणी केलेल्या टिप्पणीप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने वकील प्रशांत भूषण आणि पत्रकार तरुण तेजपाल यांच्याविरुद्ध अवमानाची कारवाई बंद करण्याचे आदेश दिले आहेत. याप्रकरणी दोघांनीही माफी मागितली आहे. २००९ मध्ये एका मुलाखतीत प्रशांत भूषण यांनी माजी आणि विद्यमान न्यायाधीशांवर भ्रष्टाचाराचे आरोप केले होते.

## चकमक फेम पोलीस अधिकारी प्रदीप शर्मा ससूनमध्ये

✔ सुराज्य/पुणे



येरवडा कारागृहात प्रकृती बिघडल्याने चकमक फेम अधिकारी अशी ओळख असलेले पोलीस अधिकारी प्रदीप शर्मा यांना ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले. उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या मुंबईतील निवासस्थानाजवळ स्फोटके ठेवण्याच्या प्रकरणी शर्मा यांना गेल्यावर्षी अटक करण्यात आली होती.

सुरक्षिततेच्या कारणांमुळे शर्मा यांना मुंबईतील ऑर्थर रोड कारागृहातून येरवडा कारागृहात हलवण्यात आले आहे. कारागृहात पोटात दुखू लागल्याने त्यांच्यावर प्राथमिक उपचार करण्यात आले. त्यानंतर त्यांना ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

उपचारानंतर पुन्हा कारागृहात नेल्यावर त्यांची प्रकृती पुन्हा बिघडली. त्यांना पुन्हा रुग्णालयात दाखल करून विविध वैद्यकीय चाचण्या करण्यात आल्या. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## मिशन बारामती जोरात, बावनकुळे पवारांच्या बालेकिल्ल्यात

✔ सुराज्य/बारामती : २०२४ मध्ये होणाऱ्या लोकसभा निवडणुकांची तयारी भाजपने आतापासूनच सुरु केली आहे. बारामती लोकसभा मतदारसंघात नियोजित 'भाजप बारामती लोकसभा मतदारसंघ मिशन'ला अखेर मुहूर्त मिळाला आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा ऑगस्टमधील लांबलेला बारामती दौरा ६ सप्टेंबर रोजी निश्चित झाला आहे. याबाबत भाजप लोकसभा प्रमुख अविनाश मोटे यांनी माहिती दिली.

प्रदेशाध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारल्यापासून बावनकुळे यांचा पुणे जिल्ह्यात पहिला दौरा आहे, तोही थेट राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्या कर्मभूमी बारामतीत. यावरुन भाजपने बारामतीला दिलेले राजकीय महत्त्व अधोरेखित होत आहे. सध्या पवारांच्या कन्या सुप्रिया सुळे बारामतीच्या खासदार आहेत.

## काँग्रेसला भगदाड : ६४ बड्या नेत्यांचा रामराम

✔ सुराज्य/श्रीनगर



काँग्रेसेचे ज्येष्ठ नेते गुलाम नबी आझाद यांच्या राजीनाम्याच्या धक्क्यातून सावरत असतानाच मंगळवारी पक्षाला आणखी एक हादरा बसला आहे.

जम्मू-काश्मीरचे माजी उपमुख्यमंत्री तारा चंद यांच्यासह पक्षातील तब्बल ६४ नेत्यांनी सदस्यत्वाचा राजीनामा दिला. यामध्ये ५० हून अधिक वरिष्ठ नेत्यांचा समावेश आहे. गुलाम नबी आझाद यांच्या समर्थनार्थ राजीनामा दिल्याचं त्यांनी सांगितलं. काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांना नेत्यांनी संयुक्त राजीनामा पत्र सादर केले, अशी माहिती पीटीआय वृत्तसंस्थेने दिली आहे.

जम्मू काश्मीरचे माजी मुख्यमंत्री आणि गांधी घराण्याचे निकटवर्तीय गुलाम नबी आझाद यांनी गेल्या आठवड्यात काँग्रेसला सोडचिठ्ठी दिली होती. गांधी घराण्याशी असलेले जवळपास पाच दशकांचे ऋणानुबंद आझाद यांनी तोडले. यावेळी त्यांनी राहुल गांधींच्या नेतृत्वावर सडकून टीका केली होती. आझाद लवकरच जम्मू-काश्मीरमधून राष्ट्रीय पातळीवरील पक्ष सुरु करणार आहेत. जम्मू-काश्मीरचे माजी उपमुख्यमंत्री तारा चंद, माजी मंत्री अब्दुल मजीद वाणी, मनोहर लाल शर्मा, घारू राम आणि माजी आमदार बलवान सिंग यांच्यासह अनेकांनी पत्रकार परिषदेत पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वासह राजीनामा जाहीर केला. आझाद यांच्या समर्थनार्थ आम्ही काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांना संयुक्त राजीनामा पत्र सादर केले आहे, असे बलवान सिंग यांनी सांगितले.

## आणखी एक लाचखोर अधिकारी जाळ्यात

✔ सुराज्य/नाशिक : आदिवासी विकास विभागाच्या बांधकाम विभागातील अभियंत्याने २८ लाखांची लाच स्वीकारल्याचे प्रकरण ताजे असताना, पुन्हा त्याच विभागात लाचखोरी झाली आहे.

कळवणच्या सहाय्यक प्रकल्प अधिकाऱ्याने चक्क कार्यालयाच्या स्वच्छतागृहात दहा हजार रुपयांची लाच स्वीकारली. प्रताप वडजे असे या अधिकाऱ्याचे नाव असून, त्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) ताब्यात घेतले आहे. त्याच्याविरुद्ध रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते. दरम्यान, येथील वरिष्ठ अधिकारी नागरिकांच्या समस्या ऐकून घेत नाहीत. परिणामी, येथील गैरव्यवहारांना खतपाणी मिळत असल्याचा दावा नागरिक करीत आहेत.

# गौतम अदानी जगात तिसरे अतिश्रीमंत

## ▸ हा मान मिळवणारी पहिली आशियाई व्यक्ती


✔ सुराज्य/नवी दिल्ली

**अब्जाधीश गौतम अदानी यांनी लुई व्हिटॉनचे अध्यक्ष आणि सीईओ बर्नार्ड अर्नॉल्ट यांना मागे टाकून ब्लूमबर्ग अब्जाधीशांच्या यादीत टॉप ३ मध्ये आपले स्थान निश्चित केले आहे. हा मान मिळवणारे अदानी हे आशिया खंडातील पहिले व्यावसायिक ठरले आहेत. विशेष म्हणजे चीनचे जॅक मा आणि भारताचे दुसरे सर्वात श्रीमंत व्यक्ती मुकेश अंबानी यांना सुद्धा आजवर हे करणे शक्य झालेले नाही.**

प्रतिष्ठित श्रीमंतांच्या यादीत टेस्लाचे मुख्य कार्यकारी अधिकारी एलोन मस्क (२५१ अब्ज डॉलर्स) आणि ॲमेझॉनचे संस्थापक जेफ बेझोस (१५३ अब्ज डॉलर्स) यांच्यापाठोपाठ १३७.४ अब्ज डॉलर्ससह अदानी यांनी तिसरे स्थान पटकावले आहे.

### बिल गेट्सना टाकले मागे

जुलै २०२२ मध्ये, मायक्रोसॉफ्टचे सह-संस्थापक बिल गेट्स यांना मागे टाकून अदानी ११३ अब्ज डॉलर्ससह जगातील चौथ्या क्रमांकाची श्रीमंत व्यक्ती बनले होते. यानंतर सामाजिक कार्यात हातभार लावण्याचा निर्णय घेतल्याने गेट्स यांची संपत्ती ११७ अब्ज डॉलर्सनी घसरली. परिणामी अदानी यांना गेट्सना मागे टाकून चौथ्या श्रीमंत व्यक्तीची जागा मिळवता आली.



### अदानी यांच्यासाठी २०२२ ठरले खास

भारतातील सर्वात श्रीमंत व्यक्ती अदानी यांनी २०२२ मध्ये त्यांची संपत्ती ६० अब्ज डॉलर्सने वाढवली आहे, जी इतर कोणाहीपेक्षा पाचपट जास्त आहे. फेब्रुवारीमध्ये अंबानींना आशियातील सर्वात श्रीमंत म्हणून मागे टाकत आणि दोन महिन्यांनंतर एप्रिलमध्ये सेंटिबिलियनर (ज्यांची संपत्ती १०० अब्ज डॉलर किंवा त्याहून अधिक आहे) अशा यादीत अदानी यांचे नाव नोंदवले गेले.

अदानी यांच्या संपत्तीत +१. १२ अब्ज डॉलरची शेवटची वाढ दिसली होती, तर या संपूर्ण वर्षात तब्बल ६०.९ अब्ज डॉलरचा व्यवहार झाला आहे.

दरम्यान, २४ जून रोजी त्यांच्या ६० व्या वाढदिवशी, अदानी यांनी सामाजिक कार्यासाठी ६०,००० रुपयांची देणगी देऊन समाजाला हातभार लावण्याचे काम देखील केले आहे.

### अदानी नेमके कुठे करतात गुंतवणूक?

**सिमेंट** - मे महिन्यात, अदानी समूहाने देशातील दुसऱ्या क्रमांकाचे सिमेंट उत्पादक होण्यासाठी होल्सिम एजीचे भारतातील सिमेंट व्यवसाय १०.५ अब्ज डॉलरमध्ये विकत घेतले. **वीज** - ऑगस्टमध्ये, भारतातील सर्वात मोठी खाजगी औष्णिक उर्जा उत्पादक अदानी पॉवरने सांगितले की ते थर्मल पॉवर प्लांट ऑपरेटर डीबी पॉवरला ७,०१७ कोटीमध्ये खरेदी केले. **बंदरे** - जुलैच्या मध्यात, इस्रायलने भूमध्य सागरी किनाऱ्यावरील प्रमुख व्यापार केंद्र म्हणजेच हायफा बंदर, अदानी पोर्ट्स, स्थानिक रसायने आणि लॉजिस्टिक समूह गॅडॉट यांना १.१८ अब्ज डॉलर्समध्ये विकण्याची घोषणा केली. **रस्ते मालमत्ता** - या महिन्याच्या सुरुवातीला, अदानी यांनी एक युनिट मॅक्केरी एशिया इन्फ्रास्ट्रक्चर फंडचे इंडिया टोल रोड आंध्र प्रदेश आणि गुजरात राज्यांमध्ये ३,११० कोटी रुपयांना खरेदी करत असल्याची घोषणा केली.

CMYK









# आज होणार गणरायांचे आगमन; उत्साह शिगेला

सुराज्य/सोलापूर

**अनेकांचे आराध्य दैवत असलेल्या बाप्पाचे बुधवारी घराघरांत आगमन होणार आहे. कोरोनामुळे दोन वर्षांनंतर मोठ्या उत्साहात हा सण यंदा साजरा होत आहे. अनेकांनी काही दिवसांपासून बाप्पाच्या मूर्तीच्या खरेदीसाठी विविध बाजारांत गर्दी केली. बुधवारी मंगलध्वनी, आरती आदी भक्तिमय वातावरणात लाडक्या गणरायाची प्रतिष्ठापना होणार असून पुढील दहा दिवस उत्तरोत्तर उत्सव रंगत जाणार आहे.**

लाडक्या गणरायाचे बुधवारी शहरातील तब्बल लाखो घरांमध्ये आगमन होणार असून दिवसभर बाप्पासाठी घराघरांत लगबग असणार आहे. त्यामुळे बाजारात उत्साह दिसून आला. अनेकांनी गणेश मूर्ती प्रदर्शनी तसेच दुकानांमध्ये गणरायाची आवडती मूर्ती खरेदीसाठी गर्दी केली होती. ज्येष्ठ नागरिकांपासून तर चिमुकल्यांपर्यंत सर्वांनीच गणरायाच्या आगमनासाठी घरात सजावट केली आहे.

गणरायासाठी आवश्यक पूजेचे साहित्य, सजावटीचे साहित्य, मखर, विद्युतमाळा आदी खरेदीसाठी रांगा लावल्या होत्या. त्यामुळे कोरोनाचे संकट असूनही बाजारांमध्ये गर्दी दिसून आली. अनेक जण मंगळवारीच गणरायाला घरी घेऊन गेले. साध्या पद्धतीने गणरायाची मूर्ती घरी आणली. पूजेसाठी लागणारी तसेच सजावटीची फुले, केवड्याची पाने, कमळ, दूर्वा, तुळशी, पत्री आदी साहित्य अनेकांनी खरेदी केले. प्रसादासाठी पेढे, मोदक यांचीही भाविकांनी खरेदी केली. सकाळी गणपतीची प्रतिष्ठापना असल्यामुळ गणेशमूर्ती मंगळवारी संध्याकाळीच वाजत गाजत नेल्या जात होत्या.



आजोबा गणपतीच्यावतीने करण्यात आलेली आकर्षक रोषणाई

कोरोना हद्दपार होण्याच्या मार्गावर

## जिल्ह्यातील २ लाख १६ हजार रूग्ण कोरोनामुक्त

**सोलापूर** : पहिल्या आणि दुसऱ्या लाटेत अनेकांच्या मृत्यूचा कारण ठरणारा कोरोना आता पुन्हा एकदा हद्दपारीच्या वाटेवर आहे.

जिल्ह्यातील ५ हजार २४१ जणांचा जीव घेणाऱ्या कोरोनाची तीव्रता प्रतिबंधित लसीकरणामुळे कमी झाली आहे. आतापर्यंत जिल्ह्यातील एक लाख ३२ हजार १४६ पुरुष आणि ८९ हजार ३९२ महिलांना कोरोना होऊन गेला. त्यातील दोन लाख १६ हजार २३६ रुग्ण कोरोनामुक्त झाले. मोहोळ व उत्तर सोलापूर हे तालुके कोरोनामुक्त झाले असून सध्या शहरात ७ तर ग्रामीणमध्ये ४३ रुग्ण आहेत.

सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील नागरिकांनी मास्क, गर्दी टाळल्याने आणि प्रतिबंधित लसींचे डोस घेतल्याने कोरोना शहरातून हद्दपार होण्यास मदत झाली आहे. सध्या शहर आणि जिल्ह्यात एकूण ५० च्या आसपास रूग्ण आहेत. मात्र आता कोरोना झालेल्या रुग्णाला कोणतीही तीव्र स्वरुपाची लक्षणे आढळत नाहीत. त्यांना घरीच उपचार करण्याची सवलत दिली आहे. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार आणि योग्य उपचार घेतल्याने चार ते सहा दिवसांत तो रुग्ण बरा होत आहे. आतापर्यंत जिल्ह्यात ३५ लाख ३० हजार ९७६ संशयितांच्या टेस्ट करण्यात आली. त्यानुसार शहरातील २० हजार १५ पुरुषांना व १४ हजार २५४ महिलांना कोरोनाची बाधा झाली. त्यातील ५४७ महिला आणि ९६४ पुरुषांचा कोरोनाने जीव घेतला आहे. ग्रामीणमधील एक लाख १२ हजार १३१ पुरुष तर ७५ हजार १३८ महिलांना कोरोनाची बाधा झाली. जिल्ह्यातील जवळपास २६ लाख व्यक्तींनी कोरोनावरील प्रतिबंधित लस घेतली आहे. आता अक्कलकोट, माढा, माळशिरस व दक्षिण सोलापूर या तालुक्यांचा शहरी भाग कोरोनामुक्त झाला आहे. मोहोळ व उत्तर तालुके कोरोनामुक्त झाले आहेत. उर्वरित प्रत्येक तालुक्यातील सक्रिय रुग्णसंख्या दहापेक्षा कमी आहेत.

# चिनी बनावटीच्या कृत्रिम फुलांमुळे नैसर्गिक फुलशेती धोक्यात

## फुल उत्पादक शेतकऱ्यांसमोर नवे संकट

सुराज्य/सोलापूर

कोरोना संकटाच्या आधीपासूनच फूल उत्पादक शेतकरी अनेक संकटांचा सामना करत आपली शेती फुलवीत आहेत. कधी रोगराई, अवकाळी पाऊस, कधी बाजारभाव तर कधी लॉकडाऊन अशा विविध संकटांचा सामना करत उभे राहण्याचा प्रयत्न करणाऱ्या फूल उत्पादक शेतकऱ्यांसमोर आता नवे संकट उभे ठाकले आहे. ते आहे चिनी बनावटीच्या कृत्रिम फुलांचे. सरकारने ही बाब गांभीर्याने घेतली नाही तर हे संकट नक्कीच जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे कंबरडे मोडणार आहे, अशी भीती काही फूल उत्पादकांनी व्यक्त केली आहे.



सध्या सणासुदीचे दिवस सुरू झालेत. आज गणपती बाप्पांचे आगमन झाले, त्यानंतर गौरीचे आगमन होईल, त्यानंतर दसरा, दिवाळी असे एकामागून एक सण येणार आहेत. त्यामुळं आता बाजारपेठा सजल्या आहेत. मात्र, या सणासुदीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील फुल उत्पादक शेतकरी संकटात आहे. याच कारण म्हणजे फुलांना असलेली कमी मागणी आणि मिळणारा अत्यल्प दर मागील अनेक वर्षांपासून सजावटीच्या प्रामुख्याने फ्लॉवरपॉटमधील फुलांची जागा कृत्रिम फुलांनी घेतली आहे. सण, समारंभ, पूजेसोबत सजावटी व तोरणांसाठी प्रामुख्याने नैसर्गिक फुलांना मागणी होती. यामध्ये शेवंती व झेंडूच्या विविध जातींचा समावेश प्रामुख्याने असतो. तर हार, पुष्पगुच्छ यांसाठी गुलाब, निशिगंध, जर्बेरा, अष्टर यांसारख्या फुलांना मागणी असते. पूजा व राजकीय, धार्मिक समारंभातले हार यांचा अपवाद वगळता सजावटीच्या इतर फुलांची जागा आता कृत्रिम फुलांनी घेण्यास सुरुवात केली आहे. कमी भांडवल असलेले सामान्य शेतकरी फुलशेतीसाठी झेंडूची निवड करतात. या झेंडूला प्रामुख्याने तोरणासाठी गणेशोत्सव, लग्नसराई, दसरा, दिवाळी, नवरात्र या काळात मोठी मागणी असते. कृत्रिम फुलांमध्ये झेंडूची फुले बनवली जातील.

### नैसर्गिक फुलशेती अडचणीत

जर्बेरा, अष्टर, गुलाब या महागड्या फुलांची जागाही आधीच कृत्रिम फुलांनी घेतली आहे. लॉन व भिंती सजावण्याच्या विविध वेली यांची जागाही कृत्रिम वस्तूंनी घेतली आहे. मोगऱ्याच्या कळ्याही आता प्लॅस्टिकमध्ये उपलब्ध आहेत. ही सर्व कृत्रिम बनावटीची हुबेहूब फुले बाजारात आल्याने नैसर्गिक फूल उत्पादन करणारी फूल शेती अडचणीत येण्यास फारसा वेळ लागणार नाही. तरकारीसोबत पिकांची शेती फारशी परवडत नाही. त्यामुळे अनेक शेतकरी फूल शेतीकडे वळाले आहेत. इतर पिकांच्या तुलनेत या शेतीमध्ये कष्ट अधिक आहेत. कष्टाची तयारी असलेले शेतकरीच या शेतीकडे वळालेला आहे. अनेक संकटांना मात देत तो टिकून आहे. मात्र कृत्रिम फुलांचे संकट हे भयंकर रूप घेऊ शकते. आजच्या स्थितीत या फुलांनी वीस टक्केहून अधिक बाजारपेठ काबीज केली आहे. भविष्यात हे प्रमाण वाढत जाणार आहे. त्याचा फायदा चीन सारख्या दुश्मन देशाला होणार हा त्याहून वाईट आहे. त्यामुळे यावर तात्काळ निर्बंध आणले पाहिजेत अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे.


### वापरावर निर्बंध घातले पाहिजेत

सध्या बाजारपेठेत ठिकठिकाणी 'चिनी' बनावटीची कृत्रिम प्लॅस्टिक फुले विक्रीसाठी आली आहेत. त्याचबरोबर गणपतीसाठी करण्यात येणारे आरास सेट हे देखील कृत्रिम फुलांचे बाजारात विक्रीसाठी आले आहेत. चीनमधून मोठ्या प्रमाणावर कृत्रिम फुलांची आयात केली जात आहे. ग्राहकांचा कल त्याकडे वाढत आहे. आशा स्थितीत फुल उत्पादक शेतकऱ्यांना मोठा फटका बसत आहे. आता कुठंतरी कोरोनाचा धोका कमी झालाय. सण, समारंभ, उत्सव साजरे होतायेत. त्यामुळे फुल उत्पादक शेतकऱ्यांना थोडाफार फायदा होईल अशी अपेक्षा होती. मात्र चिनी बनावटीची कृत्रिम प्लॅस्टिक फुले बाजारात आल्यामुळं फुल उत्पादकांना तोटा होत आहे. त्यामुळं सरकारनं तातडीनं या चिनी बनावटीच्या कृत्रिम प्लॅस्टिक फुलांच्या आयतीबाबत ठोस निर्णय घेणे गरजेचं आहे. वापरावर निर्बंध घातले पाहिजेत. तरच फुल उत्पादकांना काही प्रमाणात दिलासा मिळेल. अशी मागणी फुल उत्पादक शेतकऱ्यांतून होत आहे.

# उजनी कालवा दुरूस्त करण्यासाठी १०० कोटींची तरतूद करावी


## आ.सुभाष देशमुख यांची देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी

सुराज्य/सोलापूर



१२३ टीएमसी इतका प्रचंड पाणीसाठा करू शकणारे उजनी धरण संपूर्ण महाराष्ट्रात एकमेव व्दितीय आहे. सोलापूरसह आजूबाजूच्या जिल्ह्यातील कारखानदारीसाठी उजनी धरण अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. मात्र टफूट, भेगा यामुळे वितरणव्यवस्थेमध्ये उजनीची पाणी गळती दिवसेंदिवस वाढतच आहे. सुमारे ५ टीएमसी पाणी वाया जात आहे. याच्या वितरण व्यवस्थेतील दुरूस्तीसाठी यावर्षी केवळ २९ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. ती त्रोटक आहे. वेळेवर डागडुजी न केल्यास भविष्यात त्याच बाबींवर अनेक पट खर्च होणार आहे. तरी याची दखल घेऊन किमान १०० कोटीची तरतूद उजनी कालवा दुरूस्त करण्यासाठी करावी, अशी मागणी आमदार सुभाष देशमुख यांनी फडणवीस यांच्याकडे भेट घेऊन केली आहे.

उजनी धरणावर सोलापूर, अहमदनगर, पुणे, धाराशिव जिल्ह्याची अर्थव्यवस्था अवलंबून आहे. उजनी प्रकल्पातील कालवे, वितरण व्यवस्थेचा गेल्या ४० वर्षात सोलापूर जिल्ह्यातील शेतक-यांना अर्थ वाहिन्यांसारखा उपयोग होत आहे.




मात्र सध्या वाढलेली वाहतूक, दळणवळण, अतिवृष्टी, बदलत्या वातावरणात उजनीच्या वितरण व्यवस्थेमध्ये पाणी गळतीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे साधारण पंचवीस टक्के पाणी गळती होत आहे. हे ५ पटीएमसी पाणी वाचवणे अत्यंत गरजेचे आहे. या पाण्याच्या गळतीमुळे पाणीपट्टीचा शासनाचा महसूल दरवर्षी बुडतो शिवाय त्यामुळे २५ हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येण्यापासून वंचित राहते. अशा वितरण व्यवस्थेतील दुरूस्तीसाठी यावर्षी केवळ २९ कोटींची तरतूद केली आहे. ती त्रोटक आहे.

वेळेवर डागडुजी न केल्यास भविष्यात त्याच बाबींवर अनेक पट खर्च होणार आहे. तरी याची दखल घेऊन किमान १०० कोटींची तरतूद उजनी कालवा दुरूस्तीसाठी करावे असे आमदार सुभाष देशमुख यांनी म्हटले आहे. दरम्यान या मागणीचा सकारात्मक विचार करण्यात येईल, असे आश्वासन देवेंद्र फडणवीस यांनी दिल्याचे आमदार देशमुख म्हणाले.

# नातेपुते येथील बैलगाडा शर्यतीत सदाशिवनगरच्या पालवेंचा बैलगाडा प्रथम

**नातेपुते** : नातेपुते येथील समाजरत्न राजेंद्र पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त अतुल पाटील , माऊली पाटील मित्र मंडळ व संदीप (दादा ठोंबरे मित्र मंडळाच्यावतीने नातेपुते येथे मधुर मिलन मंगल कार्यालय ५७ फाटा येथे भव्य बैलगाडा शर्यत घेण्यात आली होती.

बैलगाडा शर्यतीचे उद्घाटन माजी आमदार ॲड. रामहरी रुपनवर, समाजरत्न राजेंद्रभाऊ पाटील, अहिल्या पतसंस्थेचे चेअरमन रघुनाथ कवितके, डॉ.एम.पी. मोरे, संजय पाटील, हणुमंतराव सुळ, उपनगराध्यक्ष मालोजीराजे देशमुख,या मान्यवरांच्या हस्ते घेण्यात आले होते. यावेळी माऊली पाटील, अतुल पाटील, संदिप ठोंबरे नगरसेवक रणजीत पांढरे, अण्णा पांढरे, अविनाश दोशी तसेच राजाभाऊ देशमुख, डॉ. अदिनाथ रूपनवर, धनाजी देशमुख, रणवीर, शक्ती पलंगे देशमुख, चंद्रप्रभ पतसंस्थेचे चेअरमन राजेश चंकेश्वरा, ॲड. शिवाजीराव पिसाळ, हणुमंतराव धालपे, डॉ. नरेंद्र कवितके, डॉ. वैभव कवितके, संतोष काळे, बाळासाहेब बोराटे आदी उपस्थित होते. बैलगाडा शर्यत मध्ये सदाशीवनगर येथील हर्षवर्धन पालवे यांच्या बैलगाडा



यांनी प्रथम क्रमांकाचे ७१ हजाराचे बक्षीस मिळविले. द्वितीय क्रमांकाचे ५१ हजाराचे बक्षीस ढोंबाळवाडी येथील पै. बबन रूपनवर यांचा बैलगाडा यांनी जिंकले तर तृतीय क्रमांकाचे ४१ हजाराचे बक्षीस गिरवी येथील महालक्ष्मी प्रसन्न यांनी जिंकले. यावेळी राजेंद्र पाटील, माळशिरस पंचायत समिती सदस्य माऊली पाटील, नगरसेवक तथा सार्वजनिक बांधकाम विभाग सभापती माऊली पाटील, संदीप ठोंबरे, यांच्या हस्ते बक्षीस वितरणाचा कार्यक्रम घेण्यात आला.